# प्रशालेय

## वार्षिक वृत्त

सौर शके १९४६–४७

दि. १ मे २०२४ ते दि. ३० एप्रिल २०२५



# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

पत्ता : ज्ञान प्रबोधिनी प्रशाला
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
दूरभाष : (०२०) २४२०७७००० / २४२०७१२१

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे

## पदाधिकारी २०२४-२५

**अध्यक्ष** - डॉ. रघुनाथ माशेलकर
**उपाध्यक्ष** - श्री. अण्णा हजारे
डॉ. विजय लक्ष्मण केळकर
**कार्याध्यक्ष** - श्री. श. बा. तथा रवि पंडित
**संचालक** - वाच. गिरीश बापट
**कार्यवाह** - प्रा. महेंद्र सेठीया
**सहकार्यवाह** - श्री. आशुतोष बारमुख

## सन्माननीय सदस्य

**डॉ. श्री. रघुनाथ माशेलकर** – माजी महासंचालक, सी.एस.आय.आर., नवी दिल्ली
**श्री. अण्णा हजारे** – सामाजिक कार्यकर्ते
**श्रीमती अनु आगा** – माजी खासदार, उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या
**वाच. जयंत नारळीकर** – माजी संचालक, आयुका, पुणे

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे

## कार्यकारी मंडळ सदस्य शके १९४६-१९४७ (इ. स. २०२४-२५)

### निर्वाचित सदस्य

१) डॉ. रघुनाथ माशेलकर
२) डॉ. श. बा./रवी पंडित
३) वा. गिरीश श्री. बापट
४) प्रा. महेंद्र सेठीया
५) श्री. आशुतोष बारमुख
६) श्री. रामकुमार राठी
७) श्री. मोहन चि. गुजराथी
८) वा. विवेक बा. कुलकर्णी
९) वा. सुधाताई कोठारी
१०) श्री. महेश आठवले
११) वा. मनोज देवळेकर
१२) वा. अनघा लवळेकर
१३) प्रा. सुवर्णा गोखले
१४) वा. मिलिंद नाईक

### संचालक नियुक्त सदस्य

१५) प्रा. प्रशांत दिवेकर
१६) वा. मधुरा लुंकड
१७) शर्मिष्ठा चिपळूणकर
१८) श्री. नचिकेत नित्सुरे

### प्रशालेतील पदाधिकारी शके १९४६-१९४७ (इ.स. २०२४-२५)

**प्राचार्य** - वा. मिलिंद नाईक
**पर्यवेक्षिका** - प्रा. मुकुलिका थत्ते
**समन्वयक** - प्रा. रागिणी नाईक (इ. ९वी ते १०वी)
**समन्वयक** - प्रा. वर्षा पुराणिक (इ. ५वी ते ८वी)
**युवक समन्वयक** - प्रा. रागिणी नाईक
**शास्त्र** - प्रा. मुकुलिका थत्ते
**युवती समन्वयक** - प्रा. संस्कृती बापट
**भाषा** - प्रा. अश्विनी जोशी, प्रा.लक्ष्मी रोशन
**सहनिवास व दलसमन्वयक** - प्रा. प्रवीण पायगुडे
**सा. अध्ययन**- प्रा. संस्कृती बापट
**अर्धवेळ अध्यापक समन्वयक** - प्रा. शिल्पा पवार
**गणित** - प्रा. वर्षा पुराणिक

## पालक शिक्षक संघ (इ.स. २०२३-२४)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) ५ वी मुली | - | ज्योती चौधरी | २) ५ वी मुले | - | सचिन मिरजे |
| ३) ६ वी मुली | - | अवंती काळे | ४) ६ वी मुले | - | माधुरी साने |
| ५) ७ वी मुली | - | ज्ञानेश्वर नेरकर | ६) ७ वी मुले | - | योगिनी शुक्ल |
| ७) ८ वी मुली | - | अमित जोशी | ८) ८ वी मुले | - | मोनाली भिडे |
| ९) ९ वी मुली | - | शलाका मेहता | १०) ९ वी मुले | - | दीप्ती जोशी |
| ११) १० वी मुली | - | संजय राठोड | १२) १० वी मुले | - | परशुराम कापसे |

**अध्यक्ष** - वा. मिलिंद नाईक
**उपाध्यक्ष** - श्री. आशुतोष नाईक
**सचिव** - सौ. अश्विनी जोशी
**सहसचिव** - श्री. हृषीकेश राजहंस, श्री. उल्हास टिळेकर

## शिक्षक प्रतिनिधी

* वा. मुकुलिका थत्ते
* प्रा. रागिणी नाईक
* प्रा. वर्षा पुराणिक
* प्रा. प्रवीण पायगुडे

## वाहतूक समिती

**अध्यक्ष** - वा. मिलिंद नाईक
**शिक्षक प्रतिनिधी** -श्री. प्रवीण पायगुडे
**पालक प्रतिनिधी** - श्री. उल्हास टिळेकर, सौ. रूपाली बेदरकर

## • भूमिका •

## • संपादकीय •

# • अनुक्रमणिका •


**१) शैक्षणिक प्रयोग**

१.१ गतिमान प्रभुत्व अध्ययन – अध्यापन पद्धती
१.२ विशेष उद्दिष्ट गट
१.३ दृक्-श्राव्य साधनांच्या साहाय्याने अध्यापन-अध्ययन
१.४ प्रकल्पातून अध्ययन
१.५ बुद्धिगुण विकास योजना
१.६ अभिव्यक्ती विकसन

**२) विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम**

२.१ विद्याव्रत संस्कार
२.२ गणेशोत्सव
२.३ बौद्धिक प्रगल्भता
१) विशेष व्याख्याने
२) विशेष वर्ग
२.४ अभ्यास शिबिरे
२.५ विशेष अभिरुची गट
२.६ प्रकल्प शिबिर

**३) सामाजिक जाणीव**

३.१ सहाध्याय दिन
३.२ आषाढी एकादशी – वारीतील सहभाग
३.३ राष्ट्रीय दिन – कार्यक्रम
३.४ वस्ती उपक्रम

**४) मानसिक समृद्धी**

४.१ संस्कार कार्यक्रम – विद्यारंभ, वर्षारंभ, वर्षान्त उपासना
४.२ साप्ताहिक उपासना व चिंतन
४.३ आषाढी एकादशी – भजन गायन

**५) शारीरिक कौशल्ये**

५.१ युवक दले – स्वा. सावरकर दल
५.२ युवक दले – डॉ. बाबासाहेब आंबेडकर दल
५.३ युवती दले

**६) नेतृत्वगुण विकसन**

६.१ कौशल्य प्रशिक्षण
६.२ अग्रणी तासिका
६.३ गुरुपौर्णिमा कार्यक्रम
६.४ सरस्वती पूजन
६.५ अग्रणी प्रशिक्षण शिबिर

**७) अध्यापक प्रशिक्षण व बैठका**

७.१ अध्यापक प्रशिक्षणे
७.२ अध्यापक बैठका
७.३ सहविचार बैठका
७.४ पालक बैठका

**८) यश**

८.१ शालान्त परीक्षा
८.२ बाह्यपरीक्षांतर्गत
८.३ स्पर्धांतर्गत

**९) विशेष दखल**

९.१ वर्गश: संचालक भेट
९.२ भेटीगाठी –
प्रशालेस मान्यवरांनी दिलेल्या भेटी
अन्य संस्थांना भेटी
९.३ प्रासंगिक

**१०) कृतज्ञता : देणगीदार, हितचिंतक**

# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

**इ. स. २०२४–२५**

## १. शैक्षणिक प्रयोग

### १.१ गतिमान प्रभुत्व अध्ययन–अध्यापन पद्धती

इ. ५ वी ते ८ वी साठी इंग्रजी व गणित विषयांसाठी स्तर पद्धती अवलंबली जाते. आपापल्या क्षमतेनुसार व गतीनुसार पुढचे अध्ययन करीत वरच्या स्तरात जाण्याची संधी या अध्ययन पद्धतीतून मिळते. इंग्रजी व गणित या महत्त्वाच्या विषयांचे पायाभूत ज्ञान दृढ होण्यास या प्रयोगाने मदत होत आहे. दरवर्षीच्या अनुभवावर आधारित बदल करत हा प्रयोग आता चांगला रुळला आहे. पुनर्भरण वर्गाची (remedial) भर या स्तरांमध्ये पडली आहे. या प्रयोगाचा परिणाम मुलांच्या क्षमता व कौशल्यांच्यावाढीमध्ये दिसत आहे.

### १.२ विशेष उद्दिष्ट गट :

विशेष उद्दिष्ट गटाचे विषय मुलांना ठरवता यावेत म्हणून दरवर्षी आपण या विषयांच्या प्रास्ताविक व्याख्यानांची योजना करतो. यावर्षीची इ. ९ वी साठीची काही प्रास्ताविक व्याख्याने एप्रिल महिन्यात व काही जून महिन्यात झाली.

**प्रास्ताविक व्याख्याने पुढीलप्रमाणे –**

| विषय | मार्गदर्शक | ९ वी मुले | ९ वी मुली |
|---|---|---|---|
| कायदा आणि घटना | श्रीनिवास देसाई | १९ एप्रिल २४ | – |
| ऊर्जा | संतोष गोंधळेकर | २० एप्रिल २४ | २० एप्रिल २४ |
| अर्थशास्त्र | अनुप गुळाणीकार | ११ जून २४ | – |
| राष्ट्रीय एकात्मता | आशुतोष बारमुख | १२ जून २४ | – |
| सामाजिक आरोग्य | डॉ. नीलांगी सरदेशपांडे | २५ जून २४ | १५ जून २४ |
| पर्यावरण | पिनाकिन कर्वे | १८ जून २४ | १९ जून २४ |
| सामाजिक मानसशास्त्र | गार्गी देवचके, मेघना गोखले | २४ जून २४ | २४ जून २४ |
| ग्रामविकसन | सुवर्णा गोखले | – | २० जून २४ |

या व्याख्यानांनंतर मुलांकडून गुगल फॉर्मद्वारे विशिष्ट उद्दिष्ट गटासाठी त्यांना हव्या असलेल्या विषयाचे २ पर्याय निवडायला संगितले व त्यातील एक विषय त्यांना विशेष अभ्यासासाठी दिला गेला.

**मुलांकडे निवडले गेलेले विषय** – अर्थशास्त्र, ऊर्जा, कायदा आणि संविधान, सामाजिक मानसशास्त्र, पर्यावरण

**मुलींकडे निवडले गेलेले विषय** – अर्थशास्त्र, ऊर्जा, कायदा आणि संविधान, ग्राम विकसन, सामाजिक मानसशास्त्र, पर्यावरण.

एकूणात विषयांची संख्या, विद्यार्थी संख्या व मार्गदर्शकांची उपलब्धता बघता यातील काही विषय एकत्र करण्यात आले. २० जुलै २०२४, शनिवारपासून गटांमध्ये तास सुरू झाले .

## १.३ प्रकल्पातून अध्ययन

स्वतःला पडलेल्या प्रश्नांची उत्तरं मिळवण्यासाठीच्या विविध पद्धती शिकणे, हे प्रकल्पपद्धती शिकण्याचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार वर्षभर विद्यार्थ्यांनी इयत्ताशः विविध प्रकारचे प्रकल्प केले. वर्षाच्या शेवटी त्या त्या विषयातील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे परीक्षण केले.

**प्रकल्पाचे बाह्य परीक्षण करणारे मान्यवर –**

| इयत्ता | प्रकल्प प्रकार | बाह्य परीक्षक |
|---|---|---|
| ५ वी | संग्रहात्मक प्रकल्प (वस्तू+कात्रण) | श्री. राजेश शिंदे |
| ६ वी | प्रतिकृती प्रकल्प | श्री. तुषार कनिकदळे |
| ७ वी | सर्जनशील लेखन प्रकल्प | प्रा. प्रिया कोलासो, श्रीम. श्रुती जयकुमार, श्रीम. मृण्मयी वैशंपायन, श्रीम. भाग्यश्रीताई हर्षे |
| ८ वी | संशोधनात्मक प्रकल्प | डॉ. ज्युतिका राजवाडे व डॉ. धनंजय बोडस |
| ९ वी | भविष्यवेध प्रकल्प | श्री. निखिल गीत, श्रीम. सुवर्णाताई गोखले, श्री. ध्रुव गोखले, श्री. अमोल फाळके, श्री. ईशान्त देशमुख, श्री. राजेश शिंदे, श्री. श्रीनिवास देसाई, श्रीम. ईशा कान्हेरे, श्रीम. गार्गी देवचके, श्री. स्वरुप जोशी |
| १० वी | स्वत:च्या निवडीचे प्रकल्प | डॉ. आदित्य पोंक्षे |

**प्रकल्प प्रदर्शन –** शनिवार दिनांक ८ मार्च २५ रोजी प्रशालेतील प्रकल्पांचे प्रदर्शन व कौतुक समारंभ आयोजित केला होता. ग्लोबंट इंडियाचे श्री. शिवराज साबळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मा. सुवर्णाताई गोखले या देखील उपस्थित होत्या.

पारितोषिक वितरणाच्या कार्यक्रमांमध्ये सर्व प्रकल्पामधील प्रथम तीन गटांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. प्रकल्प करण्याचे महत्त्व व भारतातील इनोव्हेशन याविषयी प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन केले. याच कार्यक्रमात ग्लोबंटर्फे आर्थिक सहाय्य मिळणाऱ्या स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)च्या ग्लोबंट ग्रीन एनर्जी ड्राईव्हया प्रकल्पामध्ये उत्साही सहभाग घेतलेल्या गृहसंस्थांच्या प्रतिनिधींना देखील सन्मानित करण्यात आले.

यानंतर प्रकल्प प्रदर्शनाला सुरुवात झाली. सर्व विद्यार्थ्यांनी आपले वर्षभर केलेले प्रकल्पाचे काम उपस्थितांना समजावून सांगितले. बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचे प्रकल्प उपासना मंदिरामध्ये होते व पालकांसोबतच प्रमुख पाहुण्यांनी देखील ते पाहिले.

## संग्रहात्मक प्रकल्प

### इयत्ता ५ वी मुली

| | | |
|---|---|---|
| निधी वारिअर, स्वरा चन्नागिरी | Spices | पहिला क्रमांक |
| आराध्या जगताप, मिहिरा बोरसे | Matchboxes Nuts | दुसरा क्रमांक |
| निधी शिरोलीकर, सई देसाई | Bolts, Screws | तिसरा क्रमांक (विभागून) |
| सनाया टाके, श्रिया राजहंस | Bottle Caps | तिसरा क्रमांक |

### इयत्ता ५ वी मुले

| | | |
|---|---|---|
| वेद जांभकर, सहर्ष शेलार | Currency | पहिला क्रमांक |
| ईशान गद्रे, आदित्य साठे | Electronic Parts | दुसरा क्रमांक |
| राघव डोळस, अर्णव माने | Fabrics | तिसरा क्रमांक |

## कात्रणे

### इयत्ता ५ वी मुली

| | | |
|---|---|---|
| आर्या कनिकदळे, चिन्मयी मांडके, पावनी निरुलकर, चिन्मयी गद्रे | Tourism Places | पहिला क्रमांक |
| स्वराली देव्हारे, राज्ञी बुलाख, आदिश्री जोशी, ईशान्वी वाघमोडे | Water Pollution | दुसरा क्रमांक |
| सिआ गोगटे, सौम्या भिडे, भूमी गांधी, सिया हणतोडकर | Health | तिसरा क्रमांक |

### इयत्ता ५ वी मुले

| | | |
|---|---|---|
| शौनक टेकाळे, अद्वैत मारणे, आदित्य शिंदे, श्लोक तांबे | Defence | पहिला क्रमांक |
| आराध्य नेवसे, अर्णव बनकर, वरद दाभेकर, आदित्य बेलवणकर | Transport | दुसरा क्रमांक |
| साहिल कुलकर्णी, अर्णव आयाचित, ईशान गद्रे, आदित्य साठे | Social Incidences | तिसरा क्रमांक (विभागून) |
| अर्णव माने, सौमिल लिमये, अनुज दसणूरकर, राघव डोळस | History | तिसरा क्रमांक |

## प्रतिकृती

### इयत्ता ६ वी मुली

| | | |
|---|---|---|
| वरदा घोलप, श्रेया ढोकले,<br>वेदिका खलटे, तन्वी पंडित | Foldable Cycle | पहिला क्रमांक |
| श्रिया थोरात, क्षिती घोंगडे,<br>मुक्ता ढोक, सना भावे | Animal Behaviour | दुसरा क्रमांक |
| सृजा देशपांडे, अस्मि कुलकर्णी,<br>श्रावणी मते, माही सिरसीकर | Smart Flush System | तिसरा क्रमांक |

### इयत्ता ६ वी मुले

| | | |
|---|---|---|
| यश इनामदार, भार्गव सहस्त्रबुद्धे,<br>अर्हन पाटील, अबीर निसळ | Eco Chill | पहिला क्रमांक |
| रुद्र मिरजे, आदी अरगडे,<br>अभीर विभूते, सिद्धांत वैद्य | Self-heating Tiffin | दुसरा क्रमांक |
| ओजस चांडक, राज गुजर,<br>मेघ गुजर, ईशान कदम | Auto Tree-watering | तिसरा क्रमांक (विभागून) |
| प्रबुद्ध जैन, शौनक कर्णे,<br>मेघ गुजर, ईशान कदम | Smart Exam<br>Pad System | तिसरा क्रमांक |

## सर्जनशील लेखन प्रकल्प (मराठी

### इयत्ता ७ वी मुली

| | | |
|---|---|---|
| आराधना देशमुख, हिरण्या शेजवळ,<br>इरावती गोखले, सिद्धी वाघोले | 'पूर्णामासी' | पहिला क्रमांक |
| आराध्या जरे, प्रियाली लवांडे,<br>प्रणवी हजिरनीस | 'धर्मो रक्षति रक्षित:' | दुसरा क्रमांक |

### इयत्ता ७ वी मुले

| | | |
|---|---|---|
| अद्वय फडतरे, अक्षय चिपळूणकर,<br>कौशिक रानडे | 'एक हरवलेली वाट<br>आणि कवितेची बाग' | पहिला क्रमांक |
| प्रणवीर काळे, विराज लळेकर,<br>अमेय मोरे | 'चार विश्वांच्या पलीकडे' | दुसरा क्रमांक |

## सर्जनशील लेखन प्रकल्प (इंग्रजी)

### इयत्ता ७ वी मुली

| | | |
|---|---|---|
| गार्गी पाटील, याना भोजने | "Enigma of the Mind" | पहिला क्रमांक |
| सानवी नाईक, सिया पवार | "Shadows of Yesterday" | दुसरा क्रमांक |
| सई आंबेकर, अवंती गुर्जर, आर्या खेडकर | "The Destiny of Elements" | तिसरा क्रमांक (विभागून) |
| सिया देशपांडे, जुई काळे | "Echoes of Betrayal" | |

### इयत्ता ७ वी मुले

| | | |
|---|---|---|
| ईशीत वाव्हळ, अद्वैत कोळेकर | "The Darka Defender" | पहिला क्रमांक |
| तेजस मोघे, विहान जोशी सौमिल कुलकर्णी | "The Chronicles of Xacia" | दुसरा क्रमांक |
| कनिष्क पावसकर, रामदास कुलकर्णी | "The Mystery of the Egyptian Car" | तिसरा क्रमांक |

## संशोधनात्मक प्रकल्प

### इयत्ता ८ वी मुली

| | | |
|---|---|---|
| स्वरा गिजरे, इरा जोशी, गौरी वाडेकर, प्रांजल झोडगे | "Effectivity of Fan in Rooms" | पहिला क्रमांक |
| साईशा आव्हाड, अन्वी डिंगणकर तेजश्री कुलकर्णी, संस्कृती नवले | "Mpemba Effect" | दुसरा क्रमांक |
| केतकी कुंटे, शामली मगर, तनिष्का नेरकर, आभा आपटे | "Antibacterial Properties of Saliva" | तिसरा क्रमांक |

### इयत्ता ८ वी मुले

| | | |
|---|---|---|
| हृषिकेश मु. जोशी, हृषिकेश के. जोशी शौर्यन कारंडे, अर्जुन लिमये | "Turning of Ships with different Bow Angles" | पहिला क्रमांक |
| अमोघ गुजराथी, सर्वेश कोल्हे, हृषिकेश महाजनी, शौर्य नाईक | "Ironing" | दुसरा क्रमांक |
| मिहिर गोडबोले, देवेश शुक्ल, श्लोक पारगावकर, अभिराम देशपांडे | "Effect of Magnetism on Growth of E-coil" | तिसरा क्रमांक |

## भविष्यवेध प्रकल्प

### इयत्ता ९ वी मुली

| | | |
|---|---|---|
| अनुष्का लडकत, शर्वरी मुळूक, तन्वी मुंढे | "Future of Reservations" in Maharashtra | पहिला क्रमांक |
| सान्वी चिद्रवार, जुई देवकुळे, ऋग्वेदा कुडले | "Carbon Neutral India and the Laws Required to Achieve It" | दुसरा क्रमांक |
| किआना चुत्तर, अरायना जाधव, मेधावी वाळंबे | "The Impact of Indian Festivals of Economy | तिसरा क्रमांक (विभागून) |
| अविका आचार्य, अस्मि देशमुख अदिती देशपांडे | "Economic Impact of Brain Drain on India" | |

### इयत्ता ९ वी मुले

| | | |
|---|---|---|
| आदीश वाकडे, अनीश एकबोटे, हर्षवर्धन लोहार, युगंधर लोंढे | "Future of IC Engine" | पहिला क्रमांक |
| शार्दुल अळवंडी, निनाद गोखले, रुद्र जाधव, अवनीश मोटे | "Uniform Civil Code" | दुसरा क्रमांक |
| निनाद गोडबोले, आदित्य कळदाते, तेजस खोत, नचिकेत कुलकर्णी | "Private Delivery System in India" | तिसरा क्रमांक |

---

श्री. प्रभाकर लक्ष्मणराव दाते शिष्यवृत्ती ही दरवर्षी इयत्ता पाचवी ते दहावी विद्यार्थी /विद्यार्थिनींच्या वर्गामधे गणित विषयात सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्या प्रत्येकी एक विद्यार्थी / विद्यार्थिनीस दिली जाते. रोख रकमेच्या स्वरूपात ही शिष्यवृत्ती दिली जाते.

**● शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी ●**

इ. ५वी – भक्ती गांधी, अर्णव बनकर
इ. ६वी – अस्मि कुलकर्णी, राज गुजर
इ. ७वी – सई आंबेकर, आरुष घोडके
इ. ८वी – ऋजुता पाटील, ओजस तपस्वी
इ. ९वी – अवनी भट्टड, आर्यन पवार
इ. १०वी – स्वरा अडकर, यशोवर्धन बागुल

## १.४ बुद्धिगुण विकास योजना

डॉ. जे. पी. गिलफोर्ड यांनी मांडलेल्या प्रारूपावर आधारित इयत्ता सातवीच्या गुणविकास योजनेचा अभ्यासक्रम तयार केला आहे. डॉ. गिलफोर्ड यांच्या प्रारूपानुसार बुद्धीचे स्वरूप तीन बाजूंनी निश्चित होत असते. पहिली बाजू विचाराचे माध्यम आहे. दुसरी बाजू विचारांची प्रक्रिया व तिसरी बाजू विचारांची निष्पत्ती. बुद्धिगुण विकास योजनेसाठी यांपैकी पहिल्या दोन बाजूचा विचार केला आहे. विचारांच्या माध्यमातून दृश्य, श्राव्य, प्रतीकात्मक, आशयात्मक व वर्तनात्मक गोष्टींचा विचार केला आहे तर प्रक्रियेत आकलन, स्मरण, बहुदिश विचार, एकदिश विचार व मूल्यमापन या प्रक्रियांचा अंतर्भाव आहे. पाच विचारांची माध्यमे आणि पाच विचारांच्या प्रकिया अशा २५ घटकांचा अंतर्भाव या अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.

वर्ष २३ – २४ मध्य बुद्धिगुण विकास योजनेअंतर्गत २५ कृती चाचण्या घेतल्या. त्यानुसार ७ वी मुला – मुलींच्या वर्गातून ६ मुले व ६ मुली यांची शिष्यवृत्तीधारक म्हणून निवड करण्यात आली. या बाराजणांनी सर्व २५ चाचण्यात उत्तम गुण संपादन केले आहेत. त्यांना इ. ८ वी ते १० या तीन वर्षांसाठी रुपये ५००ते २०००शिष्यवृत्ती दिली जाईल.

बुद्धिगुणविकास योजनेअंतर्गत उत्तेजनार्थ बक्षिसपात्र म्हणून पाच मुले व पाच मुली अशा १० जणांची निवड करण्यात आली. त्यांना प्रत्येकी ३०० रुपयांपर्यंतची पुस्तके देण्यात आली. अशा एकूण बारा शिष्यवृत्ती धारक आणि दहा बक्षिसपात्र विद्यार्थ्यांची यादी पुढे दिली आहे.

**❊ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी तपशील ❊**

| इयत्ता | विद्यार्थाचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| ७ वी मुले | ओजस तपस्वी | पहिला |
| | सोम चौधरी | दुसरा |
| | सनराज खोते | तिसरा |
| | अग्रण्य रानडे | चौथा |
| | आरुष जोशी | पाचवा |
| | अर्णव चौधरी | सहावा |
| ७ वी मुली | अवनी गोरकर | पहिला |
| | अनन्या जाधव | दुसरा |
| | उत्कर्षा गर्कल | तिसरा |
| | सई लिमये | चौथा |
| | प्रियशा देशमाने | पाचवा |
| | स्वरा गिजरे | सहावा |

**✻ उत्तेजनार्थ बक्षीसपात्र विद्यार्थी तपशील ✻**

| इयत्ता | विषय | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
| ७ वी मुले | दृश्य | शार्दुल मोडक |
| | श्राव्य | प्रद्युम्न हिरे |
| | प्रतिकात्मक | हृषिकेश केदार जोशी |
| | आशयात्मक | अर्चित पाठक |
| | वर्तनात्मक | ऋग्वेद रेगे |
| ७ वी मुली | दृश्य | आयुष केदार |
| | श्राव्य | केतकी कुंटे |
| | प्रतिकात्मक | तनिष्का नेरकर |
| | आशयात्मक | राधा हर्डीकर |
| | वर्तनात्मक | तेजश्री कुलकर्णी |

## १.५ अभिव्यक्ती विकसन

आपले विचार व भावना मोकळेपणाने व्यक्त करण्यासाठीचे अभिव्यक्ती हे महत्त्वाचे माध्यम आहे. गायन, वादन–पेटी, तबला, नृत्य, लेखन, वक्तृत्त्व, नाट्य, चित्रकला व शिल्पकला अभिव्यक्तीपैकी आपल्या आवडत्या अभिव्यक्तीच्या मार्गदर्शन तासिका, व्याख्याने, भेटी, प्रात्यक्षिके, शिबिरे इ. माध्यमातून घेऊन आपली कौशल्ये वाढविण्याचे प्रयत्न मुलांनी वर्षभर केले.

### ✻ अभिव्यक्ती शिबिर

यंदाच्या वर्षी अभिव्यक्ती शिबिराची सुरुवात १ एप्रिल २०२५ रोजी झाली. २२ एप्रिल मंगळवार रोजी मुलांचे प्रात्यक्षिक व २३एप्रिल बुधवार रोजी मुलींचे प्रात्यक्षिक झाले.

२०२५ या वर्षीच्या प्रात्यक्षिकात विषयांची विविधता विद्यार्थ्यांनी दाखवली.

मुख्यतः तबला, पेटी, गायन, नृत्य यांचा एक भाग व वक्तृत्व, नाट्य, लेखन यांचा दुसरा भाग तसेच चित्रकला आणि शिल्पकला यांचे प्रदर्शन अशी प्रात्यक्षिके झाली.

मुलांच्या कार्यक्रमाला प्रशालेचे माजी विद्यार्थी व ज्येष्ठ संगीतकार श्री. जितेंद्र कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. तसेच मुलींच्या कार्यक्रमाला प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी व गांधर्व महाविद्यालयातील संगीत विभागाच्या प्रमुख सौ. परिणिता मराठे या प्रमुख अतिथी म्हणून आल्या होत्या.

मुलांना व पालकांना मार्गदर्शन करताना दोघांनी त्यांच्या शालेय वयातील आठवणी सांगितल्या व त्याचे महत्त्व देखील पालकांना सांगितले.

सभेचा समारोप आदरणीय संचालकांच्या मार्गदर्शनाने झाला.

## २. विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम

### २.१ गणेशोत्सव

सौर भाद्रपद १६, शके १९४६ (शनिवार, ७ सप्टेंबर २०२४ ) यादिवशी ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथील गणरायाची प्रतिष्ठापना मा. मालतीताई कलमाडी, व्यवस्थापकीय संचालक, कन्नड विश्वास संघ यांच्या हस्ते झाली. दरवेळेप्रमाणे अखंड उत्साहात पाचवी ते दहावीच्या मुला-मुलींनी गणपती प्रतिष्ठापनेची उपासना एकदिलाने करून पुढच्या दहा दिवसांच्या आनंदपर्वाची सुरुवात केली. सकाळची आरती, संध्याकाळचे व्याख्यान/अभिव्यक्ती सादरीकरण, छोट्या कार्यशाळा (लहान गट - पर्यटन, आर्थिक साक्षरता, प्रथमोपचार, पाककला, हस्तकला; मोठा गट - आर्थिक साक्षरता, बाजाराची ओळख, अन्नप्रक्रिया - उत्पादन, आरोग्य, डिझाईन थिंकिंग आणि इनोव्हेशन, पर्यटनक्षेत्राची ओळख) अशा भरगच्च कार्यक्रमांमुळे हे काही दिवस दप्तराशिवायची शाळा मुलांनी अनुभवली.

**❊ गणेशोत्सवादरम्यान आरतीसाठी उपस्थित पाहुणे ❊**

| तारीख | वार | प्रमुख अतिथी |
|---|---|---|
| ०७/०९/२०२४ | शनिवार | मा. मालतीताई कलमाडी |
| ०९/०९/२०२४ | सोमवार | मा. अंजलीताई नानल |
| १०/०६/२०२४ | मंगळवार | मा. मंजुषाताई मुंगी |
| १२/०९/२०२४ | गुरुवार | मा. वाच. निरुपमाताई अभ्यंकर |
| १३/०६/२०२४ | शुक्रवार | मा. मिलिंद संत |
| १४/०९/२०२४ | शनिवार | मा. श्री. मुरलीधर मोहोळ,<br>केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री |
| १६/०९/२०२४ | सोमवार | मा. चारुताताई पुराणिक |
| १७/०९/२०२४ | मंगळवार | मा. नंदकुमार काकिर्डे |

**❊ व्यावसायिक कार्यशाळा (समांतर सत्र) - लहान गट ❊**

| विषय | प्रशिक्षक - मुली | प्रशिक्षक - मुले |
|---|---|---|
| आर्थिक साक्षरता | मा. अश्विनीताई छोगटू | मा. समीर कंक |
| प्रथमोपचार | मा. डॉ. सायली पेंडसे | मा. डॉ. रश्मी सप्रे |
| पाककला | मा. देवश्री कुलकर्णी | मा. पूजा पवार |
| हस्तकला | मा. रुपाली बेदरकर | मा. आसावरी गोगटे |
| पर्यटन | मा. पिनाकीन कर्वे व सहकारी | मा. पिनाकीन कर्वे व सहकारी |

### ✻ व्यावसायिक कार्यशाळा (समांतर सत्र) – मोठा गट ✻

| विषय | प्रशिक्षक – मुली | प्रशिक्षक – मुले |
|---|---|---|
| आर्थिक साक्षरता | मा. कुणाल परांजपे | मा. अजित नाईक |
| अन्नप्रक्रिया – उत्पादन | मा. चिंतामणी सहस्त्रबुद्धे | मा. सिद्धेश पुरंदरे |
| आरोग्य | मा. डॉ. मैथिली पुराणिक | मा. डॉ. पांडुरंग सुतार |
| डिझाईन थिंकिंग आणि इनोव्हेशन | मा. आशुतोष प्रचंड | मा. किसन सबनीस |
| पर्यटन क्षेत्राची ओळख | मा. पिनाकीन कर्वे व सहकारी | मा. पिनाकीन कर्वे व सहकारी |

### ✻ अभिव्यक्ती सादरीकरण – लहान गट ✻

| तारीख | वार | कार्यक्रम | सादरकर्ते |
|---|---|---|---|
| ०९/०९/२०२४ | सोमवार | संवादिनी | मा. निनाद सोलापूरकर<br>मा. अमित वझे |
| १०/०९/२०२४ | मंगळवार | गंमत गोष्टी लांब तिकडच्या | मा. अमृत सामक |
| १२/०९/२०२४ | गुरुवार | गोष्ट इथे संपत नाही –<br>पन्हाळा ते पावनखिंड | मा. सारंग भोईरकर<br>मा. सारंग मांडके |
| १३/०९/२०२४ | शुक्रवार | कथांचा नृत्याविष्कार | मा. शिल्पा भिडे व विद्यार्थी |
| १४/०९/२०२४ | शनिवार | मराठी उद्योजकांच्या अनवट वाटा | पालक अभिव्यक्ती गट |
| १६/०९/२०२४ | सोमवार | रंग, त्यांची निर्मिती व उपयोग | मा. विक्रम परांजपे |

### ✻ अभिव्यक्ती सादरीकरण – मोठा गट ✻

| तारीख | वार | कार्यक्रम | सादरकर्ते |
|---|---|---|---|
| ०९/०९/२०२४ | सोमवार | महाराष्ट्राचा भू-वैज्ञानिक इतिहास | वाच. कांतीमती कुलकर्णी |
| १०/०९/२०२४ | मंगळवार | महाराष्ट्रातील देवळे | मा. आशुतोष बापट |
| १२/०९/२०२४ | गुरुवार | महाराष्ट्रातील जनजाती | मा. गिरीश प्रभुणे |
| १३/०९/२०२४ | शुक्रवार | महाराष्ट्रातील गडकिल्ले | मा. राज मेमाणे |
| १४/०९/२०२४ | शनिवार | मराठी उद्योजकांच्या अनवट वाटा | पालक अभिव्यक्ती गट |
| १६/०९/२०२४ | सोमवार | महाराष्ट्रधर्म | मा. मोहन शेटे |

## २.२ बौद्धिक प्रगल्भता

### १) विशेष व्याख्याने

यावर्षी पाठ्यविषयांशी निगडित आणि काही अन्य विषयांवरील व्याख्यानांची योजना विद्यार्थ्यांसाठी केली होती. त्यात पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली.

| दिनांक | इयत्ता | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| ०५/०८/२०२४ | इ. ९ वी व १० वी | प्रबोधिनी आणि भारतीय लष्करातील समांतर बाबी | मेजर शिवराज गावडे |
| ०१/०८/२०२४ | इ. ९ वी व १० वी | फाळणीच्या भीषण आठवणींचा दिवा | संस्कृतीताई बापट |
| २२/०८/२०२४ | इ. ९ वी व १० वी | भारतीय ज्ञान परंपरा | डॉ. माधवी गोडबोले |
| १३/०८/२०२४ | इ. ६ वी ते १० वी | सायबर सिक्युरिटी | स.प. महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी |
| २६/०८/२०२४ | इ. ९ वी व १० वी | Career Introduction CA | सी.ए. भाग्यश्री ओक |
| ०३/०९/२०२४ | इ. ५ वी ते ७ वी | पुनरावर्तन उपक्रम | गायत्रीताई व शमाताई |
| ३१/०८/२०२४ ०४/०९/२०२४ | इ. ८ वी मुले+मुली | Conservation of flora and fauna | निवेदिताताई जोशी व विराजदादा आठले |
| ०४/१०/२०२४ | इ. ८ वी मुले+मुली प्रत्येकी १० विद्यार्थी | करियर मार्गदर्शन-नौदल | कॅप्टन श्री. वैभव रुपदे |
| ०६/१०/२०२४ | इ. ५ वी मुले+मुली | छात्र प्रबोधन विक्री | रुपालीताई बापट आणि शिल्पाताई कुलकर्णी |
| ०७/१२/२०२४ | इ. ६ वी मुली | ओळख स्वत:च्या शरीराची | मुकुलिकाताई थत्ते |
| ०२/०१/२०२५ | इ. ८ वी व ९ वी मुले | An integrated approach for taking green nano materials from Discovery to market | डॉ. सिद्धार्थ पटवर्धन |

| दिनांक | इयत्ता | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| २०/०१/२०२५ | इ. ५ वी ते ९ वी मुले | विवेकानंदांचा प्रेरणादायी जीवन परिचय | विद्यार्थी निधी पुणे या संस्थेतील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी |
| | इ. ८ वी व ९ वी मुले+मुली | राष्ट्र अर्चना | हृषिकेशदादा कुलकर्णी |
| | इ. ८ वी व ९ वी मुले+मुली | राष्ट्र अर्चना | हृषिकेशदादा कुलकर्णी |
| ०६/०२/२०२५ | | जादूच्या प्रयोगांच्या कार्यक्रमांबद्दल माहिती | जादूगार जितेंद्र रघुवीर |
| १८/०२/२०२५ | इ. ८ वी व ९ वी मुले+मुली | संगीत संयोजन कार्यशाळा | कौशल इनामदार |
| २०/०२/२०२५ | इ. ७, ८ वी व ८ वी मुले+मुली | सह्याद्री पर्वतरांगा कशा तयार झाल्या | अभिजीतदादा घोरपडे, डॉ. कांतीमती कुलकर्णी |
| १८/०२/२०२५ | इ. ८ वी व ९ वी मुले+मुली | संगीत संयोजन कार्यशाळा | कौशल इनामदार |
| ०२/०३/२०२५ | | काव्यलेखन कार्यशाळा | श्रीरंग गोडबोले |
| | | संहिता लेखन | अमित वझे |
| ०९/०३/२०२५ | इ. ९ वी मुले+मुली | आर्टिफिशियल इंटेलिजन्स कार्यशाळा | |

**अभिव्यक्ती कार्यशाळा**

**१. संगीत संयोजन शिबिर**

अभिव्यक्ती विकासनाअंतर्गत प्रशालेतील इयत्ता ८ वी व ९ वी मधील निवडक मुलामुलींसाठी संगीत संयोजनाचे एक शिबिर आयोजित केले गेले. यासाठी प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक, गीतकार, श्री. कौशल इनामदार हे प्रशालेत शिबिर घेण्यासाठी आले होते.

**शिबिराचा तपशील खालीलप्रमाणे –**

मंगळवार, १८/०२/२०२५

सकाळी ११:३० ते सायंकाळी ५:२०

**स्थळ :** वरचे सभागृह व बैठक कक्ष

**विद्यार्थी संख्या :** ३७ मुली व २० मुले

कार्यशाळेच्या सुरुवातीला श्रुतीताईंनी कौशलजींचा परिचय करून दिला.

त्यानंतर कौशलजींनी गाण्याची भारतीय परंपरा म्हणजे काय हे सांगितले. लक्षात ठेवण्यासाठी चाल सोयीची कशी असते ते उदाहरणासकट सांगितले.

पद, चरण, चाल या शब्दांचा अर्थ आणि त्याचे संगीताशी असलेले नाते उलगडून दाखवले.

भारताचे वैशिष्ट्य गोष्टी सांगणारे, ऐकणारे आणि गाणी गाणारे, ऐकणारे लोक हेच आहे असेही त्यांना जाणवल्याचे त्यांनी सांगितले.

बहुश्रुत हा शब्द ऐकण्याला महत्त्व देतो, परंतु तसाच well read साठी पर्यायी शब्द मराठीत नाही याचे मूळ श्रवण संस्कृतीमध्ये आहे असेही त्यांनी सांगितले.

भारतीय ज्ञान टिकून राहिले कारण गाण्यांमुळे न संपणाऱ्या गोष्टी कशा असतात याचे उदाहरण देण्यासाठी त्यांनी शंकराने पार्वतीला कुणीही न ऐकलेली गोष्ट सांगितल्याची आख्यायिकेचे उदाहरण दिले.

७ किंवा १२ सुरांचा पट सर्वांसाठी सारखाच असल्यामुळे अनेक गाण्यांमध्ये साम्य दिसण्याची शक्यता असते. पण त्याला संदर्भ नवीन असला की गाणं वेगळं वाटतं हे दाखवून दिलं.

नैसर्गिक क्षमतेला रियाजाची गरज आहे हे पटवून सांगितलं.

भावनांचा विचार करून कोणते सूर सुचू शकतात याचेही सोदाहरण प्रात्यक्षिक दाखवले.

अस्थिरता आणि स्थिरता शोधून, त्यानुसार कधी कोणत्या स्वरावर कसे थांबायचे हे उदाहरणातून दाखवले.

**हीच अमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे**
**माणसाने माणसाशी माणसासम वागणे**

या त्यांनी संगीतबद्ध केलेल्या गाण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. त्याची निर्मिती कशी झाली, त्याला स्वर देताना कसा विचार केला हे ही सांगितले.

खालील ओळींच्या साहाय्याने शब्द समजून घेणे, त्यांना चाल लावण्यासाठी प्रयत्न करणे याचे एक प्रात्यक्षिक सादर केले.

**नवलाख तळपती दीप विजेचे येथ**
**उतरली तारकादळे जणू नगरात**
**परि स्मरते आणिक करते व्याकुळ केव्हा**
**त्या माजघरातील मंद दिव्याची वात**

यानंतर मुलांना याचा अनुभव मिळावा म्हणून एक गद्य दिले व ते समजून घेऊन त्याला चाल लावण्याचे गटकार्य देण्यात आले. खालील ओळी प्रत्येक गटाला दिलेल्या होत्या. त्याला चाल लावायची होती.

**तुझा सूर्य उगवे आम्ही प्रकाशात न्हातो**
**तुझे गीत गातो देवा तुझे गीत गातो**
**झऱ्यातूनी निर्मळ वाहे तुझा निळा छंद**
**फुलातुनी लहरत राहे तुझा हा सुगंध**
**तुझ्या प्रेरणेने पक्षी उंच उंच जातो**
**तुझे गीत गातो देवा तुझे गीत गातो**

साधारण अर्धा ते पाऊण तास या ओळीवर काम केल्यावर विद्यार्थ्यांनी त्यांच्या चालींचे सादरीकरण केले व सर्वात शेवटी स्वतः कौशलजींनी त्यांनी लावलेली चाल सर्वांना ऐकवली.

कार्यक्रमाचा शेवटी 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी'या गाण्याची चित्रफीत बघितली. त्याचे संयोजन कसे केले याबद्दल कौशलजी बोलले.

### २. संहिता लेखन

मा. अमित वझे यांनी दि. २२/०१ रोजी युवकांच्या आणि २३/०१ रोजी युवतींच्या निवडक गटासाठी अभिव्यक्ती प्रात्याक्षिकाच्या दृष्टीने संहिता लेखन, कार्यक्रम बांधणी आणि सर्जनशील निर्मिती याविषयी मार्गदर्शन केले.

### ३. काव्यलेखन

गेली दोन तीन वर्षे अभिव्यक्ती सादरीकरणाच्या तयारीवेळी विद्यार्थ्यांनी असं सुचवलं होतं की काव्यलेखनावर अजून काम केलं पाहिजे.

विषयानुरूप एखाद्या विषयावर कविता करायची असेल आणि त्या कवितेला गेय स्वरूपात सादर करायचं असेल तर कवितेचा ताल, यमक, छंद वृत्त याबद्दल अजून जाणून घ्यावं लागेल, तर अजून चांगलं लिहिता येईल.

त्या दृष्टीने शब्द संग्रह कसा वाढवायचा, शब्दांचा चपखल वापर कवितेत कसा करायचा, कवितेतलं मीटर म्हणजे काय, काय साधलं असता कविता गेय होते, यावर कार्यशाळा घेण्यासाठी प्रसिद्ध सिने-नाट्य दिग्दर्शक, निर्माता, पटकथा, संवाद लेखक व तितक्याच समर्थपणे गीतलेखन, जाहिरात लेखन करणारे श्रीरंग गोडबोले यांनी आठवी-नववीच्या निवडक विद्यार्थ्यांसाठी कविता लेखन या विषयावर दोन सत्रांत कार्यशाळा घेतली.

कार्यशाळेत अनेक गंमतशीर खेळांद्वारे कविता लेखनातलं क्राफ्ट मुलांनी समजून घेतलं आणि एखाद्या विषयावर कविता करणं यामागे मुळात काय विचार करावा, त्या विचाराला साजेसा कवितेचा फॉर्म कसा निवडावा यावरही मार्गदर्शन केले.

### ❊ आर्टिफिशियल इंटेलिजन्स कार्यशाळा

दि. २ आणि ९ मार्च या दोन दिवशी आर्टिफिशियल इंटेलिजंस या विषयावर इ. ९ वी च्या विद्यार्थी व विद्यार्थिनींकरिता कार्यशाळा घेण्यात आली.

### ❊ प्रदर्शन

दि. ११ फेब्रुवारी २५ रोजी इ. ५ वी करिता प्राचीन भारतातील ऐतिहासिक नाण्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. त्यात सूरजसिंह गायकवाड यांनी आपला नाण्यांचा संग्रह मुलांना पाहण्यासाठी उपलब्ध करून दिला.

### २) विशेष वर्ग

इ. ९ वीतून १० वीमधे जाताना ज्या विद्यार्थ्यांना सरासरी ५० टक्क्यांपेक्षा कमी गुण ( विषयश: आणि एकूण) मिळाले आहेत, अशा विद्यार्थ्यांसाठी जून महिन्यापासून सकाळी १० ते १०.४५ या वेळेत विषयश: पुनर्भरण वर्गांची व सायंकाळी ६ ते ७ सराववर्गाची रचना केली होती. हे वर्ग जून ते मार्च या कालावधीमध्ये घेतले गेले. तसेच यावर्षी इ. ८ वी तून ९ वीत गेलेल्या याविद्यार्थ्यांपैकीनिवडक विद्यार्थ्यांचे गणित व इंग्रजी विषयांसाठी दररोज एक तास पुनर्भरण वर्ग घेण्यात आले.

## २.४ अभ्यास शिबिरे

## २.५ विशेष अभिरुची गट

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेमध्ये इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष अभिरुची वर्गांची योजना केलेली आहे. विद्यार्थ्यांमध्ये जी ऊर्जा असते, एखादी वेगळी आवड असते त्यास प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून हे वर्ग शाळेच्या आधी एक तास म्हणजे, पावणेदहा ते पावणेअकरा या वेळात भरवले जातात.

**वर्ष २०२४ – २५ या शैक्षणिक वर्षात पुढील वर्ग झाले.**

धडपड (Makers Space), rtificial intelligence, Computer Programming, Canvas painting, Gymnastics, Mehedi and mandala art, German

१५ जुलै २०२४ ते १३ मार्च २०२५ या दरम्यान, सोमवार ते गुरुवार हे वर्ग भरवले गेले. वर्षाच्या शेवटी काही विषयांसाठी मूल्यमापन चाचणी तसेच काही विषयांसाठी विशेष दिवसांचे आयोजन केलेले होते.

# ३. सामाजिक जाणीव

## ३.१ सहाध्याय दिन

चार भिंतींच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष क्षेत्रभेटी घेणे व अनुभव शिक्षण घेणे हे महत्त्वाचे आहे. सहाध्याय दिनाच्या निमित्ताने यावर्षीही विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या संस्थांना सहाध्याय दिनाच्या मदतीने भेटी देऊन नवनवीन अनुभव घेतले.

| वर्ग | दिनांक | स्थळ | अभ्यास |
|---|---|---|---|
| इ. ८ वी मुली | १८/०७/२०२४ | गुंजवणे | ग्रामीण जीवन परिचय आणि भातलावणी |
| इ. ८ वी मुले | १९/०७/२०२४ | गुंजवणे | भातलावणी |
| इ. ७ वी मुली | २१/०७/२०२४ | चिरमोडी | भातलावणी |
| इ. १० वी मुले+मुली | ३०/०७/२०२४ | विज्ञान आश्रम पाबळ | आश्रमात चालू असणारे विविध प्रकल्प, तेथील प्रयोगशाळा, यंत्रशाळा यांचे होणारे काम समजून घेणे. |
| अभिव्यक्ती सहाध्याय दिन इ. ७ वी + ८ वी मुले+मुली | १३/०८/२०२४ | प्रदर्शन | सामान्य माणसांना त्यांच्या घरात चित्र व शिल्प यांची मांडणी केली असता, ती कशा पद्धतीने बघता येईल याचा अनुभव देणे. |
| इ. ५ वी मुली | ०१/०८/२०२४ | राजा दिनकर केळकर संग्रहालय | संग्रहात्मक प्रकल्प कसा करावा, याबद्दलचे प्रत्यक्ष दर्शन |
| इ. ९ वी मुले | २३/०८/२०२४ | ताम्हिणी घाट | जैवविविधता पाहणे |
| इ. ६ वी मुली | २६/०८/२०२४ | ‘विद्याज्योती’ विशेष शाळा | विशेष विद्यार्थ्यांच्या क्षमता लक्षात घेणे व त्यांच्याबरोबर काम करणे. |
| इ. ५ वी मुले | ३१/०८/२०२४ | ‘क्लब हेरिटेज वॉक’ च्या माध्यमातून भाऊसाहेब रंगारी वाडा<br>वरदविनायक गुपचूप गणपती | क्रांतिकारकांचा इतिहास समजून घेणे आणि जुन्या वस्तू व शस्त्र पाहणे.<br>वाड्याच्या स्थापत्य शैलीबद्दल माहिती घेणे. |

| वर्ग | दिनांक | स्थळ | अभ्यास |
| --- | --- | --- | --- |
| इ. ६ वी मुले | ३१/०८/२०२४ | सुहृद मंडळ संचालित बधीर-मूक विद्यालय | सामाजिक संस्थांचा परिचय करून घेणे व समाजातील आव्हानांची जाणीव करून देणे. |
| इ. ५ वी मुले | ०५/१०/२०२४ | गणेश संग्रहालय, सारसबाग | विविध राज्यांतील आणि देशांतील गणेशमूर्ती मुलांनी पाहणे, प्रदेशानुसार मुर्तीची वैशिष्ट, विविध मूर्तीतील साधर्म्य, गणेश कथांची चित्र इत्यादींचे निरीक्षण करणे. |
| इ. ७ वी, ८ वी (मुले+मुली) | ११-१२/११/२०२४ | आघारकर इन्स्टिट्यूट | Fossil Exhibition - Fossil घडणीची प्रक्रिया समजून घेणे. |
| इ. ७ वी मुले | २९/१२/२०२४ | बेलवडे | आकाशातील वेगवेगळे तारका समूह, तारे, ग्रह यांची निरीक्षणे करणे. |
| इ. ८ वी मुले | १३/१२/२०२४ | पिंपरी-चिंचवड विज्ञान केंद्र | विज्ञान आणि तंत्रज्ञान यातील संकल्पना द्वारे समजून घेणे, तसेच मूलभूत विज्ञानातील संशोधनासाठी प्रेरणा चेतवणे. |
| इ. ७ वी, ८ वी, ९ वी मधील नाट्य अभिव्यक्तीचे विद्यार्थी |  | सुदर्शन रंगमंच | रंगमंचीय अवकाशाची (Theatre Space) शनिवार पेठ, पुणे येथील समीप नाट्यगृहाची ओळख करून घेणे. रंगमंचीय अवकाश, जागा तांत्रिकदृष्ट्या अभ्यासणे. |
| इ. ७ वी मुली | ०३/०१/२०२५ | बेलवडे | आकाशातील वेगवेगळे तारका समूह, तारे, ग्रह यांची निरीक्षणे करणे. |
| इ. ८ वी व ९ वी मुली | ०२/०१/२०२५ | पिंपरी-चिंचवड विज्ञान केंद्र | विज्ञान आणि तंत्रज्ञान यातील संकल्पना (working models) द्वारे समजून घेणे तसेच मूलभूत विज्ञानातील संशोधनासाठी प्रेरणा चेतवणे. |

| वर्ग | दिनांक | स्थळ | अभ्यास |
|---|---|---|---|
| इ. ९ वी मुले | ०८/०१/२०२५ | पिंपरी-चिंचवड विज्ञान केंद्र | विज्ञान आणि तंत्रज्ञान यातील संकल्पना (working models) द्वारे समजून घेणे तसेच मूलभूत विज्ञानातील संशोधनासाठी प्रेरणा चेतवणे. |
| इ. ६ वी व ७ वी मुले | ०४/०१/२०२५ | Know your Army Mela | सैन्य दलातील विविध रचनांचा अनुभव घेणे. |
| इ. ७ वी मुले, इ. ५ वी मुली | ०९/०१/२०२५ | बालगंधर्व कलादालन | जीविधा फाऊंडेशनतर्फे आयोजित भारताच्या प्राकृतिक निर्मितीचे रहस्य या विषयावरील प्रदर्शन बघणे. |
| इ. ६ वी मुली | ०३/०१/२०२५ | Know your Army Mela | दलात विविध प्रसंगात वापरण्यात येणाऱ्या वाहनांची माहिती घेणे. |

## ३.२ आषाढी वारी

महाराष्ट्राला संतांचा मोठा वारसा लाभला आहे. त्यांचे स्मरण व विठोबाचे भजन करण्यासाठी आषाढीस प्रबोधिनीचे सर्व सदस्य एकत्र येतात. आषाढी एकादशी निमित्ताने मोठ्या वर्गातील मुलांना एकत्रित येऊन भजन करण्याचा व त्याचे निरुपण ऐकण्याचा अनुभव घेता यावा, हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. वारीच्या आनंदसोहळ्यात विद्यार्थी-विद्यार्थिनी विविध प्रकारे सहभागी होतात. मोठ्या वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनी वारीत प्रत्यक्ष चालत सहभागी होतात. छोट्या वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनी पुण्यातील दिंड्यांमध्ये जाऊन वारकऱ्यांशी गप्पा मारणे, अभंग गायन करणे अशा माध्यमातून सहभागी होतात.

**आषाढी वारीतील प्रशालेतील मुला-मुलींचा सहभाग पुढीलप्रमाणे –**

| वर्ग | मुले | मुली |
|---|---|---|
| ५ वी | पुण्यात आलेली पालखी बघायला जाणे | अभंग गायन करणे, वारकऱ्यांशी मंदिरामध्ये जाऊन संवाद साधणे. |
| ६ वी | पुण्यात थांबलेल्या वेगवेगळ्या दिंडीत जाऊन अभंग गायन करणे, वारकऱ्यांशी संवाद साधणे. | अभंग गायन करणे, वारकऱ्यांशी मंदिरामध्ये जाऊन संवाद साधणे. |
| ७ वी | पुणे ते हडपसर, प्रत्यक्ष वारीत सहभागी होणे. | अभंग गायन करणे, वारकऱ्यांशी मंदिरामध्ये जाऊन संवाद साधणे. |
| ८ वी | वाल्हे ते नीरा, प्रत्यक्ष वारीत सहभागी होणे. | हडपसर ते दिवेघाट, प्रत्यक्ष वारीत सहभागी होणे. |
| ९ वी | नियोजन नाही | जेजुरी ते वेल्हे, प्रत्यक्ष वारीत सहभागी होणे. |
| १० वी | अभंग कार्यक्रम | आळंदी ते पुणे, प्रत्यक्ष वारीत सहभागी होणे. |

## ३.३ राष्ट्रीय कार्यक्रम

**❊ दि. १५ ऑगस्ट**

मा. कार्यवाह महेंद्रभाई सेठीया यांच्या हस्ते ठीक ७.३० वा. ध्वजारोहण झाले. यावेळी पुढील कार्यक्रम झाले.

**छोटा गट –**

छोट्या गटात कार्यक्रमाचे मुख्य वक्ते श्री.शिरीष देशमुख यांनी युद्ध साहित्यामध्ये Missile systems आणि Automatic range weapons या मधील तांत्रिक नावं त्यांची कार्यप्रणाली PPT च्या माध्यमातून समजावून दिली. अग्नी मिसाईल व त्या मागील निर्मितीचा प्रवास त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितला. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्यासोबत कामांचा अनुभव त्यांनी अनेक प्रसंगांमधून उलगडून सांगितला. कामाप्रती समर्पण भाव, Out of the box thinking, स्वतःला झोकून देऊन काम करणं, कामाचे पहाड उचलताना शांत मन:स्थितीचे महत्त्व, अशी अनेक मूल्यं विद्यार्थ्यांपर्यंत विविध गोष्टी सांगून पोचवली.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात बुद्धिगुण शोध परीक्षेत बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचे पाहुण्यांच्या हस्ते कौतुक करण्यात आले.

**मोठा गट –**

१५ ऑगस्ट च्या निमित्ताने 'होई अखंड प्रियभूमी..' याविषयी मोठ्या गटाशी बोलताना नारायणदादा वझे यांच्या मनातली 'अखंड भारत'ही संकल्पना हळूहळू आकलन, विचार, अभ्यास वाढत गेला तसतशी अधिकाधिक स्पष्ट होत गेली हे सांगितले.

याबद्दलचे विवेचन दादाने इतिहासातले इ.स. पूर्व काळापासून मागच्या आठवड्यातल्या घटनांचे वेगवेगळे संदर्भ देऊन केले. वैचारिक मतभेद असले तरी शांततामय सहजीवनातून एकत्र राहतात येतं, हा महत्त्वाचा विचार भारत आज सगळ्या जगाला देऊ पाहतोय. कोविड काळात भारताने आपल्या शेजारील राष्ट्रांना केलेली मदत, यातून भारताची वेगळी प्रतिमा उभी राहू पाहतेय. हा भारत आहे. हे भारताचे चारित्र्य आहे. इस्लामची कट्टरता कमी होऊन ती एक उपासना पद्धती असेल, आणि 'आसिंधूसिंधू' हा अखंड भारत परत एकदा निर्माण होईल, असा विश्वास दादाने जागवला.

**❊ प्रजासत्ताक दिन –**

भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम २६ जानेवारी २०२५, सौर माघ ०६, १९४६ या दिवशी ज्ञान प्रबोधिनीत मा. कार्यवाह महेंद्र सेठिया, मा. प्राचार्य डॉ. मिलिंद नाईक. व्याख्याते मा. अर्थव काळे, मा. पुष्कर औरंगाबादकर यांच्या उपस्थितीत उत्साहाने पार पडला. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मोठ्या गटाकडे अर्थव काळे यांचे 'भारताचा विकास पडताळयचा कसा?' या विषयावर तर लहान गटाकडे मा. औरंगाबादकर यांचे व्याख्यान झाले. भारताची अर्थव्यवस्था जागतिक क्रमवारीत जरी वरच्या क्रमांकावर असली, तरी हा विकास कधी आणि कसा मोजला जातो,? नेमका भारत कोणत्या क्षेत्रात प्रगतीशील आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासाचे दर्शक कोणते याबद्दल अमेय दादाने व्याख्यानामध्ये मांडणी केली. लहान गटाकडे पुष्कर दादांनी टाटा उद्योगसमूहाच्या उभारणीच्या गोष्टीच्या आधारे भारतीय उद्योजकतेचा इतिहास विषद केला.

## ३.४ वस्ती उपक्रम (दांडेकर वस्ती)

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील विद्यार्थ्यांना वस्ती भागातील मुलांशी संवाद साधता यावा, त्यांची सामाजिक जाणीव, संवेदनशीलता वाढावी यासाठी दहा वर्षांपूर्वी दांडेकर पुलाजवळच्या वस्तीत हा उपक्रम सुरू केला. प्रशालेचे कर्मचारी सदस्य श्री. सचिनदादा ओव्हाळ यांकडे या उपक्रमाची जबाबदारी आहे. या वर्षाकरिता उपक्रमात नोंदणी झालेले ३६ विद्यार्थी आहेत. यामध्ये ११ मुले व २५ मुली आहेत. उपक्रमात नियमित उपस्थित असणारे सोळा विद्यार्थी आहेत. या वर्षासाठी ठरलेल्या वेळेपेक्षा ४५ मिनिटांचा वेळ जास्त आणि रविवारी सुद्धा उपक्रमातील अभ्यासिका जानेवारीपर्यंत आठवड्यातील सातही दिवस (सोमवार ते शनिवार सायंकाळी ६:३० ते ८:१०, रविवारी सकाळी ११:०० ते १२:३०) सुरू होती.

**या वेळचे उपक्रम–**

दररोज ३० मिनिटे लंगडी, कबड्डी, खो–खो खेळ होतात. शनिवारी सायंकाळी शक्य असल्यास एस. पी. कॉलेजच्या परिसरातील 'रुईया मूक बधिर शाळे'च्या फरशीच्या मैदानावर खेळासाठी घेऊन जात होतो. शालेय अभ्यासक्रम शिकवणी सोबत अभ्यास कौशल्य, जीवन कौशल्य, आरोग्य आणि विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यांची सत्रे आणि भाषा विकास आणि संभाषण कौशल्य साठी हर्षदा अभ्यंकर या ताईने मदत केली आहे.

**जीवन कौशल्य–**

* कागदी वस्तू, फुलांच्या माळा, त्रिमिती यामध्ये चौरस, आयत, शंकू इत्यादीच्या प्रतिकृती मुलांनी केल्या.
* चित्रकलेचा तास शुक्रवारी आणि मूर्तिकलेचा तास रविवारी घेतला. यामध्ये रेषा सराव, मूलभूत आकार /सराव त्रिमिती आकार, सावलीआकार, मूळ रंगापासून तयार होणारे रंग इत्यादी सत्रे झाली.
* 2D, 3D, आकार, कार्विंग पद्धत, माती ओळख, प्राणी–कासव, तुळस वृंदावन, खाद्यपदार्थांमध्ये वडापाव, इत्यादी बनवून झाले.
* शनिवारी मुलींसाठी नृत्य अभिव्यक्ती होते, यामध्ये मनीषा शिंगाडेताईंनी मदत केली.
* दिवाळीमध्ये ३०० पणत्यांनारंग देऊन ७०–८० घरांमध्ये पणती वाटप केले.

**आरोग्य –**

मुलांमध्ये पाकीटबंद पदार्थ खाण्याचे प्रमाण अधिक आहे. यामध्ये कुरकुरे, बांबू खाण्याचे प्रमाण अधिक आहे. ते कमी करण्यासाठी आपण प्रकल्पातील मुलांना राजगिरा लाडू, ड्रायफ्रूट लाडू, चिक्की, शेंगदाणा लाडू इत्यादी पौष्टिक खाऊ देऊन मुलांच्या संध्याकाळच्या वेळेतील आरोग्यास हानिकारक पदार्थ कमी करण्याचा प्रयत्न केला.

मुलांच्या वैयक्तिक स्वच्छतेकडे आपण लक्ष दिले. अभ्यासिकेत आलेली मुले नीट–नेटके स्वच्छ हातपाय धुवून येत आहेत असे पहिले. स्वच्छ कपडे, केस, नखे कापलेली आहेत हे पहिले. सतत अस्वच्छ असेल तर आपण पालकांना भेटून या बाबी पालकांच्या लक्षात आणून दिल्या.

चुईंगम रोज सतत खाणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे, ते कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

८ वी तील एका विद्यार्थिनीला खरूज सदृश त्वचा आजाराबाबत पालकांच्या लक्षात आणून देऊन उपचार करून घेतला.

उपक्रमाची जागा आणि परिसर मुले स्वतः साफ करतात.

**विशेष दिन –**

स्वातंत्र्य दिन ध्वजारोहण, रक्षाबंधन, गुरू पौर्णिमा आणि संविधान दिन, चित्ररूप शिवजयंती हे दिवस वसतीमध्ये साजरे केले .

**बक्षीस योजना –**

सलग महिन्यातील पूर्ण दिवस उपस्थित असणाऱ्या मुलांना महिना अखेर बक्षीस देऊन पुढे सातत्य राहावे, याकरिता प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम अनेक मुलांना नियमितता राखण्यास मदत झाली.

**ग्रंथालय –**

शालेय साहित्य आणि अवांतर वाचनाची पुस्तके यामध्ये गोष्टी, चरित्रे, साहस कथा, इत्यादी प्रकल्पात उपलब्ध करून दिली आहेत. आठवड्यातून एकदा दर मंगळवारी पुस्तके देव-घेव करतो आहोत.

**सहली/ सहाध्याय –**

४ ऑक्टोबर २०२४ रोजी डी.पी. रोडला 'वाईल्ड लाइफ'मेला पाहण्याकरिता गेलो. यामध्ये प्रदर्शन पाहणे आणि फनी गेम्स खेळ खेळले. या प्रदर्शनात पर्यावरण पूरक दैनंदिन वापरातील वस्तू, प्राणी बचाव (Rescue) करणाऱ्या संस्था आणि पद्धत पाहता आल्या. कृत्रिम पक्षी घरटी आणि ते बनवण्यासाठी साहित्य आणि पद्धती पाहता आल्या. या प्रादर्शनात मुलांनी आनंद घेतला. १ डिसेंबर २०२५ रोजी राजीव गांधी प्राणिसंग्रहालय, कात्रज या ठिकाणी सहल गेली होती. यामध्ये ८ मुले सहभागी झाली.

**विशेष भेटी –**

१ जानेवारी २०२५ या दिवशीज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील खजिनदार मुग्धाताई गाडगीळ यांनी सहकुटुंब प्रकल्पाला भेट दिली. मुलांसोबत संवाद साधला प्रकल्पात काय काय सुरू आहे,याबाबत मुलांकडून त्यांनी जाणून  घेण्याचा प्रयत्न केला आणि मुलांना खाऊ दिला.

**विशेष–**

शालेय हस्ताक्षर स्पर्धेत प्रकल्पातील विराज पवार (६ वी) हा विद्यार्थी 'रावसाहेब पटवर्धन'शाळेत प्रथम आला. शाळेने त्याला प्रशस्तीपत्रक देऊन कौतुक केले.

# ४. मानसिक समृद्धी

**४.१ संस्कार कार्यक्रम –** विद्यारंभ, वर्षारंभ, विद्याव्रत व्याख्याने, विद्याव्रत शिबिर, विद्याव्रत संस्कार, साप्ताहिक उपासना व चिंतन, आषाढी एकादशी – भजन गायन

**※ विद्यारंभ उपासना**

दि. १५ जून २४, शनिवारी इ. ५ वी मुला–मुलींची विद्यारंभ उपासना झाली. या उपासनेस मुलांबरोबर पालकही सहभागी झाले होते. उपासनेनंतर पाचवी मुले व मुली यांनी त्यांनी केलेले वर्गसंकल्प सर्वांना सांगितले. त्यानंतर प्रमुख अतिथी महेंद्रभाई सेठिया यांनी विद्यार्थ्यांशी आणि पालकांशी संवाद साधला. मुलांना संकल्प पूर्तीसाठी मार्गदर्शन केले व अभ्यासासोबतच अनेक गोष्टींचे अनुभव घेण्याचे महत्त्व सांगितले.

**※ वर्षारंभ उपासना (इ. ५ वी ते ८ वी)**

दि. २२ जून २४ रोजी वर्षारंभ उपासना झाली. प्रमुख अतिथी म्हणून माननीय सहकार्यवाह श्री. आशुतोष बारमुख उपस्थित होते. पाचवी ते आठवी मुला– मुलींचे आपल्या वर्गाच्या संकल्पाचे तसेच शिक्षक आणि कर्मचारी सदस्यांचे संकल्प वाचन झाले. माननीय सहकार्यवाह आशुतोष दादांनी मुलांना मार्गदर्शन केले. बोलताना सुरुवातीला त्यांनी कल्पना आणि संकल्प यातील फरक सांगितला. वर्गसंकल्प कसे निश्चित करण्यात आले ती प्रक्रिया मुलांना उलगडायला सांगितली. संकल्प ठरवत असताना काय विचार झाला पाहिजे, हे लक्षात आणून दिले. यातून माणूस म्हणून आपण कसे उत्तम घडू असा विचार झाला पाहिजे. संकल्प साखळीचा उपयोग स्वतःच्या प्रगतीसाठी कसाकरून घेतला पाहिजे हे समजावून सांगितले.

**※ वर्षारंभ उपासना (इ. ९वी व इ. १०वी)**

दि. २२ जून रोजी वर्षारंभ उपासना झाली. वर्षारंभ उपासने नंतर मोठ्या गटची सभा झाली. मा. प्राचार्यांनी प्रस्तावना केली आणि वर्षारंभ व संकल्प यांचे महत्त्व सांगितले.

त्यानंतर नववी आणि दहावीच्या मुला–मुलांनी तसेच शिक्षक आणि कर्मचारी सदस्यांनी संकल्प वाचन केले. पुढे कार्यक्रमात मा. प्राचार्यांनी पुष्कर पळसुळे ( मा. आप्पांचे नातू) ह्यांचे स्वागत केले. त्यानंतर पुष्कर पळसुळे ह्यांनी आप्पांच्या आठवणी सांगत मुलांना मार्गदर्शन केले. ह्यानंतर १० वी शालान्त परीक्षेत विशेष यश मिळालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक मा. संचालकांनी केले.

परीक्षेतील उत्तम यशाबरोबरच प्रकल्प करणे गरजेचे आहे. त्यामुळे पराक्रम करण्याची शक्ती मिळते. आणि असे पराक्रम करण्यासाठी वैयक्तिक आणि सामुदायिक संकल्प करावेत. आपले संकल्प हे हळूहळू संघरचनार्थ आणि राष्ट्रार्थ होत गेले पाहिजेत. आणि शाळेतून बाहेर पडल्यानंतरही हे पराक्रम करत राहिले पाहिजे. पुढील आयुष्यासाठी आत्ता करत असलेल्या पराक्रम करण्याच्या सवयी किती महत्त्वाच्या आहेत हे विविध उदाहरणे देऊन सांगितले. भाषाणात पुढे त्यांनी भारतीय बुद्धीची संकल्पना मांडली व बुद्धी वापरून केलेली निरीक्षणे पचवता आली पाहिजेत हे सांगितले. साठवण–आठवण ह्या स्वरूपापेक्षा अनुभव पचवत काय घ्यायचे आणि काय विसर्जित करायचे हे शिकण्याचे महत्त्व सांगितले. आणि असे करणारे आयुष्यात कायम चमकतात असेही सांगितले .

शेवटी इ. ९ वी मुलींच्या वर्गप्रतिनिधींनी केलेल्या संकल्पानुसार मा. संचालकांना स्वतः केलेली भेटवस्तू दिली आणि सभेची सांगता झाली.

**※ विद्याव्रत संस्कार**

**विद्याव्रत संस्कार (इ. ८ वी)**

इ. ८ वी तील विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी केला जाणारा हा महत्त्वपूर्ण शैक्षणिक संस्कार आहे. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रताची ओळख व्हावी, या दृष्टीने विद्याव्रत व्याख्यानमालेत पुढील मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

**※ वर्षभर सुरू असलेली विद्याव्रत व्याख्यानमाला ※**

| विषय | दिनांक | वक्ते | सार |
|---|---|---|---|
| विद्याव्रत प्रस्तावना<br>(इ. ८ वी मुली)<br>(इ. ८ वी मुले) | ०५/०८/२०२४<br>०६/०८/२०२४ | प्रा. अश्विनी जोशी | विद्या म्हणजे काय? व्रत काय असते? संस्कार म्हणजे काय? विद्याव्रत म्हणजे काय? ते कशासाठी असते? या गोष्टी समजावून सांगितल्या. व्यक्तिमत्त्व विकसन कसे घडवायचे, पंचकोश म्हणजे काय? |
| शारीरिक विकसन<br>(इ. ८ वी मुली) | २८/०८/२०२४ | प्रा. प्रज्ञा अक्कलकोटकर | आपले शरीर कसे असावे? |
| व्यायामशास्त्र<br>(इ. ८ वी मुली) | ०३/०९/२०२४ | डॉ. मंदार अक्कलकोटकर | खाण्यापिण्याच्या सवयी, व्यायामाच्या सवयी, विश्रांती याविषयी मार्गदर्शन |
| मानसिक विकसन<br>(इ. ८ वी मुली) | २४/०९/२०२४ | मृण्मयी वैशंपायन | शरीर आणि मन नाते, सवयी व प्रेरणा या संकल्पना, विद्याव्रतामध्ये मानसिक विकसनाची आवश्यकता इ. वर मार्गदर्शन. |
| मानसिक विकसन<br>(भाग २)<br>(इ. ८ वी मुले) | ०२/१०/२०२४ | मृण्मयी वैशंपायन | स्वत:च्या भावनांची ओळख आणखी चांगली होण्यासाठी कृतिसत्र. |

| विषय | दिनांक | वक्ते | सार |
|---|---|---|---|
| मानसिक विकसन (इ. ८ वी मुली) | ०३/१०/२०२४ | मृण्मयी वैशंपायन | स्वत:च्या भावनांची ओळख आणखी चांगली होण्यासाठी कृतिसत्र. |
| मानसिक विकसन (इ. ८ वी मुली) | ०९/१०/२०२४ | मेघनाताई गोखले | भावनांची ओळख, त्यांचा स्वीकार आणि नियमन इ. वर मार्गदर्शन. |
| बौद्धिक विकसन (इ. ८ वी मुले) | २६/११/२०२४ | संस्कृतीताई बापट | बौद्धिक विकसन, विकसन कसे करायचे याबद्दल मार्गदर्शन. |
| बौद्धिक विकसन (इ. ८ वी मुले) | ०३/१२/२०२४ | संस्कृतीताई बापट | बौद्धिक विकसन, विकसन कसे करायचे याबद्दल मार्गदर्शन. |
| इ. ८ वी मुले + इ. ८ वी मुली | ०७/०१/२०२५ ०८/०१/२०२५ | अमृताताई जोशी | विद्याव्रत पोथीचा अर्थ, विद्याव्रत या संस्काराबद्दल मार्गदर्शन. |

**❊ विद्याव्रत शिबिरे**

दि. २८ जानेवारी ते ३ फेब्रुवारी या कालावधीत इयत्ता आठवीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी स्वतंत्रपणे विद्याव्रत शिबिर झाले. या शिबिरामध्ये विकसनांवर आधारित कृतिरूप सत्रे झाली. दैनंदिन उपासना, व्यायाम, दल, दासबोध पठण, दैनंदिनी लेखन अशा सत्रांची योजना रोज केली होती.

'प्रस्तावना आणि भित्तिपत्रक' या सत्राच्या निमित्ताने वर्षभर ऐकलेल्या विविध व्याख्यानांचा आढावा घेता आला. 'स्वाध्याय प्रवचन'या सत्रामध्ये आप्पांच्या व्याख्यानांवर आधारित पुस्तकातील दिलेल्या निवडक लेखांचा स्वाध्याय करून त्याविषयी गटात प्रत्येक विद्यार्थ्यांनी मांडणी केली. 'वादविवाद'या सत्रात दोन गटात दिलेल्या विषयाचा विचार करून आपली मते मांडण्याचा मुलांनी प्रयत्न केला. तंत्र म्हणून एखादा विषय समोर आला की दोन्ही बाजूंनी विचार करून तो विषय समजून कसा घेता येईल आणि आपले मत कसे मांडता येईल हे विद्यार्थ्यांनी अनुभवले. 'गटकार्य'अनुभवताना सामाजिक विकसन म्हणून इतरांना कसे समजून घ्यायचे आणि स्वतः गटात मिसळून आपली जबाबदारी कशी पूर्ण करायचे हे समजून घेतले. '६ हॅट्स'या सत्रात एखादा निर्णय घेताना त्या निर्णयाचा परिणाम कसा होऊ शकतो, इतरांच्या भावना काय असतील हे समजून घेण्यासाठी कसा विचार करावा असे समजून घेतले. स्वतःमध्ये डोकावणे आणि व्यक्त व्हायला शिकणे यासाठी एकांत अनुभवून मुलींनी व्यक्ती/वस्तू यांसोबत मौनसंवाद साधून हा संवाद लेखनातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. निःस्वार्थ वृत्तीने सेवा करणे हा संस्कार रुजावा या हेतूने 'श्रमदान'करण्याचे सत्र योजले होते. व्रतपालन करणारे रामदासी जवळून बघता यावेत यासाठी शिबिर सज्जनगडावर घेतले जाते. एखाद्या तरी रामदासी बुवांशी संवाद व्हावा आणि त्यातून शिकता यावे यासाठी एका सत्रामध्ये गडावर राहून सेवा करणाऱ्या एका रामदासी बुवांची मुलाखत घेऊन त्यातून मार्गदर्शन मिळावे अशी योजना होती. 'शारीरिक विकासना'चे कृतीरूप सत्र म्हणून आपल्या शरीराच्या क्षमता समजून घेण्याच्या दृष्टीने अडथळ्यांची शर्यत प्रत्येक विद्यार्थ्याने पूर्ण केली. माननीय कार्यवाहांनी विद्यार्थ्यांना आपले संकल्प पूर्ण करण्यासाठी काय आणि कसे करता येईल यावर मार्गदर्शन दिले.

मा. सुभाषराव देशपांडेंनी समारोपाच्या सत्रात विद्याव्रत पूर्ण करण्यासाठी काय काय करता येईल, अडचणी आल्या तर त्यावर मात कशी करायची यावर मार्गदर्शन दिले.

**❊ विद्याव्रत संस्कार समारंभ –**

दि. १ मार्च आणि २ मार्च २०२५, सौर १० आणि ११ फाल्गुन १९४६ या दिवशी मुलींचा आणि मुलांचा विद्याव्रत संस्कार समारंभ झाला.

मुलींच्या विद्याव्रत संस्कार समारंभासाठी नर्मदालयाच्या मा. भारतीताई ठाकूर या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या तर मुलांच्या विद्याव्रत संस्कार समारंभासाठी अहिल्यानगर येथील 'स्नेहालय'संस्थेचे संस्थापक डॉक्टर गिरीश कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते.

आज बाहेरच्या जगात मौजी बंधन व्रताकडे एक इव्हेंट म्हणून बघितले जाते.पण इथे प्रबोधिनीत मात्र मुलींनी, हे सहजपणे स्वीकारलेलं व्रत आहे; असं म्हणून भारतीताईंनी मुलींचं आणि त्यांच्या पालकांचं कौतुक केलं आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. बांधकाम व्यवसायामध्ये सगळ्यात जास्त लक्ष जसं पाया मजबूत करण्यावर असतं तसं ज्ञान प्रबोधिनी ही संस्था या विद्याव्रत संस्कारातून मनुष्यनिर्माण आणि राष्ट्रनिर्माणाच्या पायाभरणीचं काम करत आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. स्वामी विवेकानंद केंद्राच्या कार्यापासून त्यांच्या कामाची सुरुवात कशी झाली ते सांगत नाशिक ते दिल्ली सायकल प्रवास आपले गिर्यारोहणाचे प्रसंग सांगून प्रतिकूलतेवर मात करून पुढे वाटचाल करणाऱ्या त्यांच्या जीवनातील काही व्यक्तींचे अनुभव त्यांनी या वेळेला कथन केले. गिर्यारोहक बचेंद्री पाल, त्याची जर्मन मैत्रिण जी स्वतः अंध असून तिने तिबेटी भाषेचा शब्दकोश कसा तयार केला, अंध मुलांना घेऊन गिर्यारोहण कसं केलं याबद्दलचं वर्णन त्यांनी केलं.

मुलांकडे मार्गदर्शन करताना मा. गिरीश कुलकर्णी यांनी त्यांच्या शालेय जीवनात त्यांच्या गुरुजनांमुळे दुसऱ्यासाठी काही करण्याची, सहवेदनेची शिदोरी कशी मिळाली ते सांगितले. याच प्रसंगांच्या प्रेरणेतून आणि बाबा आमटेंसारख्या ज्येष्ठ समाजसेवकाबरोबर काम करताना आलेल्या अनुभवातून १९८९ साली त्यांनी वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी आणि त्यांच्या मुलांसाठी 'स्नेहालय'ची सुरुवात केली, हे सांगितले. विद्याव्रत संस्कारामुळे अन्यायाविरुद्ध लढण्याची, सत्याबरोबर राहण्याची, स्वतःचा ठसा उमटवण्याची, समाजासाठी काही करण्याची प्रेरणा कशी मिळते हे त्यांनी नीहार कुलकर्णी (त्यांची मुलगी), मा. अय्याज तांबोळी – IAS अधिकारी, (दोघेही प्रशालेचे माजी विद्यार्थी) यांच्या उदाहरणांवरून स्पष्ट केले. त्यांनी व्रतार्थींचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या इथल्या वंचित मुलांच्या शाळेला भेट देऊन तेथील मुलांना प्रेरित करण्याचे आवाहन त्यांनी विद्याव्रतींना केले.

मा. प्राचार्यांनी आपल्या प्रास्ताविकात हिंदू संस्कृतीतील चार आश्रम, त्यातील कर्तव्य, सोळा संस्कार त्यांचे महत्त्व मांडले. मा. संचालकांनी समारोपाच्या भाषणात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे सध्या परवलीचा शब्द ठरलेल्या 'भारतीय ज्ञान प्रणाली' आणि प्रबोधिनीत होणारे संस्कार यांचा सहसंबंध स्पष्ट केला. विद्याव्रत संस्कार केवळ प्रबोधनीपुरता मर्यादित न राहता कसा सर्व दूर पोहोचत आहे हे सांगितले. आकाशाला गवसणी घालण्याचे आवाहन त्यांनी केले आणि आशीर्वादही दिला. दोन्ही दिवशी काही विद्यार्थ्यांची व पालकांची प्रातिनिधिक मनोगतेही झाली

### ४.२ साप्ताहिक उपासना व उपासनेनंतरचे चिंतन

| लहान गट | विषय | मोठा गट | विषय |
|---|---|---|---|
| संस्कृतीताई बापट | गौतम बुद्ध व त्यांचे तत्त्वज्ञान | प्रशांतदादा कुलकर्णी | |
| अंजलीताई कर्वे | रवींद्रनाथ टागोर | मा. प्रमोदराव सडोलीकर | आ. आप्पांच्या स्मृतीदिनानिमित्त आप्पांच्या आठवणी |
| ह्षिकेशदादा कुलकर्णी | भारतीय ऋषी - वैज्ञानिक/ गणितज्ज्ञ/खगोलशास्त्रज्ञ | रोहितदादा पांढारकर | प्रशालेतील व त्यानंतरच्या काळातील अनुभव |
| संस्कृतीताई बापट | बुद्ध व बुद्ध धर्म | मा. श्री. सुहास पानसरे | शाळेत असताना केलेल्या उपक्रमांचे, घेतलेल्या अनुभवांचे महत्त्व |
| प्रशांतदादा दिवेकर | भारतीय संस्कृती आणि परंपरा यातील निसर्ग | श्रेयशदादा फापाळे | निवडणूक यंत्रणा कशी काम करते या संदर्भात माहिती |
| प्रथमेशदादा गोखले | श्री समर्थ रामदास स्वामी आणि त्यांचे जीवनकार्य | मा. अनघाताई लवळेकर | आदरणीय उषाताई खिरे यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल मांडणी केली आणि त्यांना श्रद्धांजली वाहिली |
| तुषारदादा बोरोटीकर | नेताजी सुभाषचंद्र बोस | मा. प्राचार्य डॉ. मिलिंदराव नाईक | खेळाचे व्यक्तिमत्त्व विकासातील महत्त्व सांगितले. जिद्द, चिकाटी रेझिलियन्स खिलाडूवृत्ती, निर्णयक्षमता, गटकार्य विजिगिषु वृत्ती इ. अनेक गुणांच्या वृद्धीसाठी खेळाचे महत्त्व वादातीत आहे असे त्यांनी मांडले. खेळ हे संघटनाचे महत्त्वपूर्ण साधन आहे व त्याने मनाची आवश्यक अशी लवचिकता साधता येते असे त्यांनी सांगितले. |
| श्रेयशदादा फापाळे | आ. एकनाथजी रानडे आणि विवेकानंद शीलास्मारक | मनीषाताई कामतिकर | कबीर का व्यक्तिमत्त्व और कृतित्व |

| लहान गट | विषय | मोठा गट | विषय |
|---|---|---|---|
| अमृताताई जोशी | १. वैदिक साहित्यामध्ये अंतर्भूत असणाऱ्या वेद, संहिता, अरण्यक, उपनिषद इत्यादींविषयी थोडक्यात सांगून उपनिषदांमध्ये विशद केलेल्या साहित्याचा सविस्तर आढावा.<br>२. मा. उषाताई खिरे यांना श्रद्धांजली | | |
| संस्कृतीताई बापट | लडाखमध्ये लढल्या गेलेल्या रेझांग या युद्धाबद्दल मांडणी | | |
| जयश्रीताई कटीकर | एकात्मता स्तोत्रातील ब्रह्मपुत्रा नदीविषयी मांडणी | | |
| श्वेताताई अकोलकर | एकात्मता स्तोत्रातील राजा रवीवर्मा यांच्याविषयी मांडणी | | |
| हृषिकेश कुलकर्णी | Crisis of National Identity, National Confidence, National Character and National Leadership<br>या आ. आप्पांनी मांडलेल्या मुद्द्यांवर आधारित मांडणी | | |

## ४.३ आषाढी एकादशी भजन कार्यक्रम

आषाढी एकादशी निमित्त भजनाचा कार्यक्रम सौर, २६ आषाढ, शके १९४६, बुधवार, १७ जुलै २०२४ रोजी संपन्न झाला. सुरुवातीला मौन आणि बरोबर ८ वाजता अलंकापुरी पुण्यभूमी पवित्र हे मंजुळ सूर कानावर पडले आणि भजनाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. ज्ञान प्रबोधिनीच्या भजन कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य म्हणजे प्रबोधिनीतल्या वेगवेगळ्या विभागातले काही सदस्य भजनं, अभंग म्हणतात आणि त्या पाठोपाठ उपस्थित सर्वजण यांच्यामागे अभंग गायन करत असतात. त्यामुळे विठ्ठल नामाचा गजर असो, अभंग असतो, सगळेजण भजनात तल्लीन होऊन जातात.

उपासना मंदिरातलं वातावरणच भक्तिरसपूर्ण असतं. यावेळी इयत्ता दहावी मुलांच्या वर्गांनी सजावटीची जबाबदारी स्वीकारली होती. आळंदी ते पंढरपूर आणि देहू ते पंढरपूर या दोन मुख्य पालख्या

त्यांच्या मार्गावरच्या मुक्कामाच्या ठिकाणाची नावं आणि त्यावर छोटं चित्र अशा स्वरूपात उपासना मंदिराच्या दोन बाजूंच्या भिंतींवर त्यांनी लावली होती.

जय जय रामकृष्ण हरी, जय जय विठोबा रखुमाई, ज्ञानेश्वर माउली ज्ञानराज माउली तुकाराम असे गजर आणि विठ्ठलाची आळवणी करण्यासाठी वेगवेगळ्या धुनी यांनी कार्यक्रमाची रंगत वाढत गेली.

ज्ञान प्रबोधिनीचे मा. संचालक, मा. कार्यवाह, मा. प्राचार्य; इ. ७ वी ते १० वीतल्या विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक,माजी विद्यार्थी, वेगवेगळ्या विभागातले सदस्य, पालक यांची उत्स्फूर्त उपस्थिती कार्यक्रमाला लाभली होती.

मा. संचालकांच्या हस्ते विठ्ठलाची आरती होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# ५. शारीरिक कौशल्य

## ५.१ युवक दले

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेची मुलं दररोज संध्याकाळी आतुरतेने वाट पाहतात असा भाग म्हणजे ज्ञान प्रबोधिनी – युवक विभागाचे दैनंदिन क्रीडा दलं. वर्षभर मैदानावर भरपूर मनसोक्त खेळ खेळायची, रगडून व्यायाम करण्याची, कडक शिस्तीतील संचलन करण्याची, मोठ्या दादांकडून ऐतिहासिक गोष्टी ऐकायची, देशभक्तिपर गीते म्हणायची, स्वतःच्या क्षमता हरप्रकारे ताणायची, दादांकडे पाहत मोठं होण्याची जागा म्हणजे दैनंदिन दल.

चांगले मैदान मिळण्याची अडचण, मर्यादित वेळेचे मोठ्या संख्येचे दल यातून वाट काढत चांगले दल ह्या वर्षी झाले. दल घेणारे ज्ञान प्रबोधिनीच्या एकूण १५ युवक कार्यकर्त्यांनी (दादांनी) दलासाठी वर्षभर काम केले. ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी अशा वयोगटांमध्ये ह्या वर्षी २ दैनंदिन दले झाली.

**❊ स्वा. सावरकर दल –**

**मैदान** – स प महाविद्यालय व नातुबाग, शुक्रवार पेठ.

**वर्षभरात झालेले खेळ** – लंगडी, डॉजबॉल , दश हस्तांतरण, गोल खो खो,

**विशेष उपक्रम** – वारी अनुभव – सर्व मुल वर्गशः वारी मध्ये सहभागी झाली. इ. ५ वी मधल्या

मुलांनी पुण्यात पालखी आल्यावर त्याचे दर्शन घेतले आणि एकंदरीत वारी कशी असते हे पाहिले.

इयत्ता ६ वी मधल्या मुलांनी पुण्यात निवासाला आलेल्या दिंड्यांमध्येजाऊन वारकऱ्यांशी गप्पा, अभंग गायन असे केले. इ. ७ वी मधल्या मुलांनी पुणे ते हडपसर गाडीतळ हा टप्पा वारकऱ्यांसोबत पायी पूर्ण केला.

**❊ किल्ले स्पर्धा –**

ह्यावर्षी ४ पथकांमध्ये दिवाळीत ‘किल्ले स्पर्धा’घेण्यात आली. चार पथकांनी ४ वेगवेगळ्या किल्ल्यांची प्रतिकृती केली होती. किल्ल्यांचा इतिहास बऱ्याच वेळा आपल्याला माहीत असतो त्याचसोबत त्याची भौगोलिक रचना समजून घेणे, त्याचे महत्त्व समजून घेणे हे ही तितकेच महत्त्वाचे. राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, हरिश्चंद्रगड अशा ४ किल्ल्यांच्या सुंदर प्रतिकृती मुलांनी केल्या होत्या. ह्याचे परीक्षण युवक विभागातल्या दादाने केले.

**❊ मातृभूमि पूजन –**

१५ ऑगस्ट रोजी दलावर मातृभूमि पूजन कार्यक्रम झाला. आपल्या देशाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मातृभूमि पूजन करायचे असते. एकाच दिवशी ६ ठिकाणी गटांमध्ये हा कार्यक्रम झाला. इयत्ता ५ वी मधल्या मुलांच्या घरी हा कार्यक्रम झाला. एकूण १००पेक्षा जास्तलोक ह्या मातृभूमी पूजनाच्या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**❊ दुर्गभ्रमण सहली –**

इतिहास समजून घेणे, गड–किल्ले पाहणे, त्यांच्या गोष्टी ऐकणे असा हेतू ह्या सहलींचा असतोच त्यासोबत गट बांधणी (पथक बांधणी), शारीरिक विकसन, अनुभव शिक्षण असाही असतो.

**समर्थ रामदास पथक –** किल्ले राजगड २४ मुलं, ४ दादा

**महर्षी दयानंद पथक –** किल्ले राजगड २३ मुलं, ५ दादा

**स्वामी विवेकानंद पथक –** किल्ले विसापुर– १८ मुलं, ३ दादा

**योगी अरविंद पथक –** किल्ले विसापुर २९ मुलं, ३ दादा

**❊ गणेशोत्सव –**

गणेशोत्सवात दलावर लेझिम आणि सार्थ अथर्वशीर्ष ह्यांचे गट बसले होते. इयत्ता ६ वी आणि ७ वी असा एकूण ८२ मुलांचा लेझिमचा गट होता. लेझिमची ५ प्रात्यक्षिक आणि १ महाप्रात्यक्षिक अशी एकूण ६ प्रात्यक्षिकं झाली. इयत्ता ५ वी ने सार्थ अथर्वशीर्ष पाठांतर केले होते. या गटाने एकूण २७ मंडळांमध्ये आणि श्रीमंत दगडूशेठ गणपती समोर सुद्धा अथर्वशीर्ष पठणसादर केले. प्रात्यक्षिक झाले. सामूहिक पठणाबरोबर सर्व मुलांनी घरोघरी जाऊन सुद्धा अथर्वशीर्ष पठण केले. एकूण १४६२ घरांमध्ये जाऊन अथर्वशीर्ष पठण झाले.

**❊ शिबिर–**

वर्षभरात दोन शिबिरे झाली. क्रीडा शिबिर आणि हिवाळी शिबिर. दलावर पथकशः रचना झाली आणि त्याचे भरपूर चुरशीचे अंतिम पथकशः सामने क्रीडा शिबिरात झाले. त्याचसोबत डिसेंबरच्या महिन्यात ३ दिवसीय हिवाळी शिबिर झाले. ह्या शिबिराचे मुख्य उद्दिष्ट खेळातील प्राविण्य मिळविणे, दैनंदिन व्यायामात सुधार होण, गट बांधणी, एकत्रित मजा करणे असे होते.

**❊ विक्री–**

मुलांनी ह्यावर्षी विक्री कौशल्य शिकण्यासाठी पणती विक्री केली.

**❊ सायकल सहल –**

स्वतःच्या शारीरिक क्षमता ताणणारी ७ वी मुलांची सायकल सहल खडकवासला येथे झाली. ह्यावर्षी स्वा. सावरकर दलावर दलाची रोजचीसरासरी उपस्थिती १०० राहिली. स्वा. सावरकर दलावर छत्रपती शिवाजी महाराजांवर साखळी कथाकथने झाली.

युवक विभाग आयोजित किशोर आंतरदलीय क्रीडा स्पर्धेमध्ये सावरकर दलाच्या गोल खो खो संघाने सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद पटकावले. तसेच ह्या वर्षी दश हस्तांतरण खेळातसुद्धा विजेतेपद मिळवत आपली तयारी दाखवून दिली.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दल –**

**मैदान –** स प महाविद्यालय व नातुबाग, शुक्रवार पेठ.
**झालेले खेळ –**कबड्डी, व्हॉलीबॉल, हँडबॉल, फुटबॉल.
**विशेष उपक्रम –** वारी अनुभव – महाराष्टच्या संस्कृतीची ओळख व्हावी ह्या हेतूने ८ वी मुलांनी वारकऱ्यांसोबत पायी वाल्हे ते नीरा हा टप्पा पूर्ण केला.
**दुर्गभ्रमण सहली –** उज्ज्वल इतिहसाची साक्ष देणारे गड–किल्ले पाहणे, आजूबाजूचा भूगोल जाणून घेत, खेडोपाडी पसरलेला भारतीय समाज पाहणे असा हेतू असतो.
**इ.८ वी –** जीवधन गड –३७ जण, ४ दादा
**इ. ९ वी –** जीवधन गड –३४ जण, ५ दादा

या ठिकाणी निवासी पदभ्रमण सहली झाल्या. सहवासातून शिक्षणासाठीसुद्धा ह्या सहलींचा अनेक संघटनांमध्ये उपयोग होत असतो.

**⁕ पथक प्रतिनिधी दले–**

दलाच्या कामातून नेतृत्व विकसन व्हावे, यासाठी १० वेळा निवडक मुलांचे पथक प्रतिनिधी दल झाले.

**⁕ हिवाळी तंबू शिबिर –**

इ. ८, ९ वी मुलांचे ३ दिवसीय साहस शिबिर केळद (ता. राजगड) या गावी पार पडले. रॅपलिंग, ग्राम परिचय, कार्यकर्त्यांची प्रेरणादायी अनुभवकथने, गटकार्ये इ. अनेक सत्रं शिबिरात झाली. ग्रामीण जीवनशैलीचा अनुभव मुलांना ह्या निमित्ताने घेता आला.

इ.८ वी युवकांचे विद्याव्रत शिबिर सज्जनगड येथे उत्तम प्रकारे पार पडले. आदर्श दिनक्रमाचा अनुभव मुलांना ह्या निमिताने घेता आला. दलाच्या दादांचाही पूर्णवेळ सहभाग ह्या शिबिरात होता.

**⁕ गृहभेटी –**

दलावर येणाऱ्या २० पेक्षा जास्तमुलांच्या गृहभेटी दादांनी मिळून केल्या. ह्यावर्षी भा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलाची रोजचे सरासरी उपस्थिती – ९० राहिली.

विविध उपक्रमांच्या बरोबर रोजच्या दलावर – नियमित व्यायाम, खेळ कौशल्य प्रशिक्षण, संचलन.

दादांची विचारप्रवृत्त करणारी वैचारिके, प्रार्थना इ. गोष्टी झाल्या. पावसाळ्याच्या काळात मैदानाच्या अडचणीमुळे यंदा प्रथमच टर्फ (turf)चा वापर महिनाभर केला. ९ वी मुलांनी ह्या ठिकाणी फुटबॉल खेळाचा आनंद घेतला.

इ. १० वी मुलांनी दिवाळी मध्ये कर्वे रस्ता येथे कंदील विक्रीचा स्टॉल लावून रू. ४,९१,८११/–

इतकी उच्चांकी विक्री केली. उपक्रमाचे बजेट तयार करणे, ठेवी गोळा करणे इथपासून शेवटचा हिशोब जमा करणे ही सर्व कामे मुलांनीच केली, हे विशेष.

इ.१० वी मुलांनी पुण्यातील नागरी वस्त्या पाहून तेथील मुलांसाठी काही अभ्याससत्रे घेतली. ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिकेद्वारे चालणाऱ्या प्रज्ञा विकास कार्यक्रमात मुलांनी ही सत्रे तेथील मुलांसाठी रविवारी घेतली.

ही दले चालवणारे ज्ञान प्रबोधिनीचे युवक कार्यकर्ते स्वयंसेवी भावनेने काम करतात. त्यांचे नित्य प्रशिक्षण, प्रेरणा जागरण शनिवारच्या दादांच्या दलावर झाले. या शिवाय दलाचे नियोजन ठरवण्याची साप्ताहिक बैठक दोन्ही दलांची झाली.

इ.१० वी मुलांनी जिल्हा परिषद क्रीडा स्पर्धांमध्ये आपला सहभाग - हँडबॉल व व्हॉलीबॉल खेळांमध्ये घेतला. हँडबॉल खेळामध्ये मुलांनी उपान्त्य सामन्यापर्यंत धडक मारली.

गणेशोत्सवात बरची नृत्याचा गट ८-१० वी मुलांचा बसला होता. ज्ञान प्रबोधिनीचे खास वैशिष्ट्य असलेले बरची नृत्य अतिशय शिस्तीत उत्साहात मुलांनी सार्वजनिक ठिकाणी सादर केले. आपल्या समाजाची जाणीव ठेवत विशेष मुलांसाठीच्या तारा सोफोश केंद्र, पिंपळे गुरव येथे बरची सादर केली.

इयत्ता........वी मुलांनी शैक्षणिक उपक्रम संशोधिकेच्या प्रज्ञा विकास कार्यकमातील ४ नागरी वस्त्यांमध्ये जात तेथील मुलांचेविविध उपक्रम घेतले. यामध्ये अभ्यासिकेचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. स्वतःच्या पलीकडे पाहायला लावणारा व आपल्याला येते आहे ते इतरांना शिकवायचे असते, हा संस्कार करणारा हा उपक्रम
झाला.

## ५.३ युवती दले

**※ प्रशालेय दल**

युवतींचे वर्षभरात नियमित क्रीडा दल झाले. यामध्ये चार दिवस खेळशः आणि एक दिवस पथकशः दल अशी रचना होती. समाजाची ओळख व्हावी, समाजात मिसळावे या हेतूने 'आषाढी वारी'या सामाजिक उत्सवाच्या काळात इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी आळंदी ते पुणे, आठवी मुली हडपसर ते दिवेघाट आणि नववी मुली जेजुरी ते वाल्हे या टप्प्यात सहभागी झाल्या. यामध्ये मुलींनी दिंड्यांमध्ये मिसळून चालणे, अभंग म्हणणे, वारकऱ्यांशी संवाद साधणे असे अनुभव घेतले.

गणेशोत्सवात इयत्ता पाचवी सहावी मुलींनी अथर्वशीर्ष पठण, सातवी मुली लेझीम, आठवी मुली कलरी पयट्टू आणि नववी दहावी मुली बर्ची नृत्यात सहभागी होत्या. धडक प्रात्यक्षिकांच्या निमित्ताने एकाच दिवशी सातवी ते आठवी मधील मुली १५ ठिकाणी या सामूहिक नृत्याचे सादरीकरण करून प्रबोधिनीच्या भूमिका पोहोचवू शकल्या. याशिवाय तीन प्रात्यक्षिके आणि तीन मिरवणुका यांमध्ये हा गट सहभागी होता.

प्रशालेय दलातील मुलींमध्ये विक्री कौशल्य वाढावे, संपर्क कौशल्य वाढावे आणि एखादा उद्योग व्यवसाय कसा चालतो याची तोंडओळख व्हावी, यासाठी विक्री उपक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमात ५वी ते १०वी मधील सर्व मुलींचा सहभाग होता. दिवाळीमध्ये वापरात येणाऱ्या विविध साहित्याची (आकाश कंदील, पणत्या, उटणे, दिवे, रांगोळी, भेटवस्तू संच इ.) विक्री करून सर्व पथकांनी मिळून सुमारे पावणे दोन लक्ष रुपये नफा कमावला.

या उपक्रमात इयत्ता दहावी मधील मुलींचे उद्योजकतेचे विकसन व्हावे, यासाठी त्यांनी भांडवल मिळवणे, काय उत्पादन विकायचे, कसे बनवायचे इ. निर्णयापासून ते तयारसाहित्य पोहोचवण्यापर्यंत सर्व नियोजन करून पथकात एकत्रितकाम केले.

डिसेंबर महिन्यात शेवटच्या आठवड्यात चार प्रकारची शिबिरे झाली.

प्रशालेय गटातील पाचवी ते सातवीच्या मुलींसाठी क्रीडा शिबिर योजण्यात आले. ज्यामध्ये मुख्यतः क्रीडा प्रात्यक्षिकांच्या पूर्वतयारीसाठी भर दिला गेला. यासोबत पद्य सत्र, गटचर्चा, गटकार्य अशा सत्रांचा समावेश होता. आठवी नववी मुलींसाठी तंबू शिबिर योजले होते. ग्रामीण भागात जाऊन ग्रामीण जीवन अनुभवणे, स्वावलंबन अशा हेतूंनी शिबिरातीलसत्रांचे नियोजन केले गेले. एक दिवस चुलीवर स्वयंपाक करण्याचा अनुभवही मुलींनी घेतला. गावात जाऊन राहण्याची, तेथील लोकांशी संवाद साधण्याची संधी मिळावी, यासाठी जवळच्या दहा गावात जाऊन दोन ते तीन तासांचे मेळावे घेऊन त्या रात्री त्याच गावात भोजन आणि निवास करावा अशी योजना होती. सकाळी उपासना करून मुली शिबिर स्थळी पोहोचल्या. इ. दहावी मुलींसाठी अभ्यास शिबिर आयोजित करण्यात आले. ज्यामध्ये मौनाभ्यास, गटचर्चेतून अभ्यास, प्रश्नपत्रिका सोडवणे अशा पद्धतींनी मुलींनी अभ्यास केला. शिवाय रोज एक सत्र याप्रमाणे चार सत्रांचे नियोजन होते. यामध्ये आदर्श उत्तरपत्रिका लेखन, परीक्षेच्या काळात तणावाचे व्यवस्थापन, पूर्वतयारी चांगली व्हावी यादृष्टीने वेळेचे नियोजन अशी सत्रे झाली. आपण मिळवलेल्या ज्ञानाचा वापर समाजासाठी उपयुक्त काम करण्याची प्रेरणा मिळावी यादृष्टीने शेवटच्या सत्राची योजना होती.

या सर्व शिबिरात एकूण २४० मुली आणि १५ मार्गदर्शिका सहभागी झाल्या.

जानेवारी महिन्यात क्रीडा प्रात्यक्षिकांच्या दृष्टीने पूर्वतयारी झाली आणि सौर माघ ६ शके १९४६(२६ जानेवारी) रोजी प्रत्यक्ष क्रीडा प्रात्यक्षिकांमध्ये प्रशालेय गट सहभागी होता.

सौर माघ महिन्यात (फेब्रुवारी) पथकशः स्पर्धांची तयारी करण्यासाठी वेळ होता. नंतर सौर फाल्गुन महिन्यात (मार्च) प्रत्यक्ष पथकशः क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या.

वर्षभरात प्रत्येक वर्गाची एक सहल झाली. तपशील खाली दिले आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५वी | – | रायरेश्वर, | ८वी | – | भीमाशंकर, |
| ६वी | – | रायरेश्वर, | ९वी | – | हरिश्चंद्रगड, |
| ७वी | – | तिकोना, | १०वी | – | रायगड |

अशा प्रकारे शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि सामाजिक विकसन व्हावे या दृष्टीने विविध उपक्रमांची योजना एकूण व्यक्तिमत्त्व विकसन चांगल्या प्रकारे व्हावे यासाठी केली गेली.

*** प्रबोध शालेय दल –**

हे पूर्ण वर्ष साप्ताहिक पद्धतीने प्रबोध शालेय दल सुरू होते. गटकार्य, कलासत्र, खेळ, गटचर्चा अशा विविध माध्यमांचा वापर केला गेला.

गणेशोत्सवात बर्ची नृत्याचे प्रशिक्षण दिले गेले. सुमारे ४० जणींचा गट गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी होता. याच गटातील २५ मुलींनी नवरात्रीच्या निमित्ताने दसऱ्याच्या दिवशी झालेल्या एका मिरवणुकीत सहभाग घेतला. या वर्षभरात या गटासाठी एकूण दोन शिबिरांची योजना केली गेली. दोन्ही शिबिरात सुमारे १५० जणींचा सहभाग होता.

क्रीडा प्रात्यक्षिकांच्या निमित्ताने एरोबिक्स या व्यायाम प्रकाराचे प्रशिक्षण दिले गेले. या गटातील १० मुली प्रत्यक्ष क्रीडा प्रात्यक्षिकात सादरीकरणासाठी उपस्थित होत्या.

*** महाविद्यालयीन दल –**

वर्षभर साप्ताहिक पद्धतीने नियमित महाविद्यालयीन दल झाले. गट चर्चा, कला, क्रीडा, मार्गदर्शनपर व्याख्यान अशा विविध माध्यमांचा वापर केला गेला. अंतर्गत स्नायूंची ताकद वाढावी या हेतूने योगासनांचे प्रशिक्षण दिले व सराव केला. युवतींच्या शारीरिक क्षमता विकसनाच्या हेतूने लाठी काठी, बोथाटी, चक्र अशा साहसी खेळांचे प्रशिक्षण दिले गेले.

यावर्षी महाविद्यालयीन गटासाठी नेतृत्व प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात नियोजन कौशल्य, संवाद कौशल्य, कार्यवाही कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य अशा नेतृत्वासाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्याचे प्रशिक्षण दिले. 'नेतृत्व' संकल्पना स्पष्ट करताना उत्तम नेता, नेतृत्त्वाचे प्रकार असेही समजावून सांगितले. या शिबिरात १७ युवती आणि २ मार्गदिशिका उपस्थित होत्या.

गणेशोत्सव, दीपोत्सव अशा सामाजिक उत्सवांच्या निमित्ताने गटासाठी उपक्रम राबविण्यात आले. गणेशोत्सवाच्या निमित्ताने या गटाचे साधारण दीड महिना नियमित दल झाले. यासाठी सुमारे १२५ मुलींचा नियमित सहभाग होता. यामध्ये बरची नृत्य, ध्वजधारी गट व त्याच्या साथीसाठी ढोल आणि ताशा वादनाचे प्रशिक्षण दिले गेले. याशिवाय या गटातील दहा जणी नवरात्रीच्या कालावधीत दसऱ्याच्या निमित्ताने झालेल्या मिरवणुकीत सहभागी होत्या.

या गटातील सुमारे १५ युवती क्रीडा प्रात्यक्षिकांमध्ये लाठी काठी, जळती बोथाटी, चक्र अशा साहसी खेळांच्या सादरीकरणात सहभागी होत्या.

*** युवती विभाग क्रीडा प्रात्यक्षिके –**

सौर माघ ६, दि. २६ जानेवारी रोजी पुणे केंद्रातील युवती विभागाच्या सर्व दलांनी एकत्र येऊन क्रीडा प्रात्यक्षिके सादर केली. खाशाबा जाधव क्रीडा निकेतन, सरिता नगरी येथील मैदानावर ही प्रात्यक्षिके झाली.

यात २२५ शालेय युवती, महाविद्यालयीन व प्रौढ गटातील गटातील ७५ युवती (मार्गदर्शिका, स्वयंसेविका मिळून) सहभागी झाल्या होत्या. संचलनाने प्रात्यक्षिकांची सुरुवात झाली. नंतर मनोरे, सूर्यनमस्कार, एरोबिक्स, कराटे, लंगडी, लगोरी ॲथलेटिक्स, अमेरिकन डॉजबॉल, कलरीपयट्टू, खोखो, रोप योगासने, मर्दानी खेळ, बोथाटी, चक्र, बरचीनृत्य असे विविध प्रकार सादर झाले.

प्रत्यक्ष सादरीकरण झाल्यावर तनूमनात एक ध्यान या पद्याने सभेची सुरुवात झाली. युवती संघटन सचिव प्रज्ञाताई हिने प्रस्तावना करून युवती विभागात काय शिकतो आणि हे क्रीडा प्रात्यक्षिक का यामागचा हेतू सांगून सभेस सुरुवात झाली.

मा. संचालकांनी स्वामी विवेकानंदांचे विचार आणि प्रबोधिनीतील सदस्य म्हणून आपण काय प्रकारचे काम करायचे आहे याबाबत मार्गदर्शन दिले. प्रार्थनेच्या शेवटच्या कडव्याने प्रात्यक्षिकांचा समारोप झाला.

***

# ६. नेतृत्व गुणविकसन

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत नेतृत्वगुण संवर्धनास महत्त्व दिले जाते. त्यासाठी 'अग्रणी योजना' राबवली जाते. प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी तासिका व विशेष व्याख्यानांचे आयोजन केले जाते. इ.९वी व १०वीमध्ये नेतृत्वगुण विकसनासाठी तासिका असतात. यात नेतृत्वासाठी आवश्यक गुण व कौशल्ये जसे संवाद कौशल्य, गटकार्य, गटबांधणी, नियोजन व कार्यवाही, समस्या परिहार, निर्णय कौशल्ये इ. चा समावेश होतो. इ.१०वीमध्ये आपल्या नेतृत्वगुणांना धार लावण्यासाठी विविध प्रकारे प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव अग्रणी घेतात.

## ६.१ अग्रणी शिबिर

इ.नववीतून दहावीत जाणाऱ्या भावी अग्रणींसाठीचे ११-१२ नोव्हेंबर या दोन दिवशी अग्रणी प्रशिक्षण झाले. या शिबिरामध्ये नेतृत्वाची संकल्पना, नेत्याची कामे व जबाबदाऱ्या, नियोजन कौशल्य, अग्रणी जबाबदाऱ्या इत्यादी विषयावरती सत्रे झाली. यामध्ये संकल्पनात्मक मांडणी,कृती सत्रे व नियोजनाची सत्रे यांचा अंतर्भाव केलेला होता. हे विद्यार्थी जानेवारी ते डिसेंबर असा वर्षभर आपल्याला दिलेल्या गटाचे नेतृत्व करण्याचे प्रत्यक्ष अनुभव घेतील . नियोजन कौशल्य या विषयावर श्रेयशदादा फापाळे याने मुलांकडे व मीराताई शेटे हिने मुलींकडे सत्र घेतले. नचिकेतदादाने विवेकानंदाचे नेतृत्वगुण या विषयावर लेख वाचून चर्चा घेतली. 'गटात काम करताना' या विषयी प्रज्ञाताई अक्कलकोटकर यांनी मुलींना व संकेतदादा भंडारे यांनी मुलांना मार्गदर्शन केले. रागिणीताईंनी दोन्ही वर्गांना अग्रणी योजना समजावून सांगितली व त्यांच्या जबाबदाऱ्या जाहीर केल्या. त्यानंतर जबाबदाऱ्यांनुसार गटश: कामाचे नियोजन करून घेतले .

## ६.२ गुरुपौर्णिमा कार्यक्रम

गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन करणे हा अग्रणींनी प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव घेण्यातील एक भाग. सर्व वर्गांचे अग्रणी आपापल्या वर्गासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करत असतात. संवाद कौशल्य, नियोजन कौशल्य, गटबंधणी, उद्दिष्ट निश्चिती, पत्रलेखन - वृत्तलेखन करणे अशी विविध प्रकारची कामे अग्रणी करत असतात.

| वर्ग | दिनांक | व्यक्ती | विषय |
|---|---|---|---|
| ५ वी मुले | २४/०७/२०२४ | मा. आदित्यदादा शिंदे | स्वामी विवेकानंदांच्या बालपणीच्या गोष्टी |
| ५ वी मुली | २३/०७/२०२४ | मा. अमरदादा परांजपे | गुरु-शिष्य परंपरा |
| ६ वी मुले | १९/०७/२०२४ | मा. सुवर्णाताई गोखले | गुरु-शिष्य संबंध |
| ६ वी मुली | २४/०७/२०२४ | मा. अनघाताई लवळेकर | गुरुपरंपरा |
| ७ वी मुले | २३/०७/२०२४ | मा. सुभाषराव देशपांडे | गुरु-शिष्याचे नाते |
| ७ वी मुली | २०/०७/२०२४ | मा. मनीषाताई शेटे | मी कशी घडले? |
| ८ वी मुले | २४/०७/२०२४ | मा. महेंद्रभाई सेठिया | स्वत:ला कसे घडवावे? |
| ८ वी मुली | २३/०७/२०२४ | मा. बागेश्रीताई पोंक्षे | अनुभव हाच गुरु |
| ९ वी मुले | २४/०७/२०२४ | मा. संचालक | योगी म्हणजे कोण? संन्यास म्हणजे काय? |
| ९ वी मुली | २३/०७/२०२४ | मा. कॅप्टन सनत भाटे | शिष्य : एक व्यक्ती नाही वृत्ती |
| १० वी मुले | २३/०७/२०२४ | मा. आशुतोष बारमुख | स्वप्रेरणा व ध्येयनिश्चिती |
| १० वी मुली | २१/०७/२०२४ | मा. अजितराव कानिटकर | राष्ट्रघडणीत युवतीची भूमिका |

## ६.३ सरस्वतीपूजन – मुले व मुली

नवरात्राच्या निमित्ताने देवीच्या बुद्धिरूपाची पूजा सरस्वती पूजनाच्या माध्यमातून केली गेली. देवी सरस्वतीचे पूजन ज्ञान प्रबोधिनीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध बौद्धिक खेळ खेळून केले.

इ. १० वी अग्रणींनी इ. ५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी बुद्धीच्या विविध पैलूंना चालना देणारे बौद्धिक खेळ तयार केले होते.

दि. ११ ऑक्टोबर २४ रोजी झालेल्या या कार्यक्रमात सुरुवातीला सगळ्यांनी श्लोकगायन करून देवीस वंदन केले. मा. प्राचार्य वाच. मिलिंद नाईक यांनी विद्यार्थी गटाला व प्रज्ञा मानस संशोधिकेच्या वाच. धनश्रीताई सोवनी यांनी विद्यार्थिनींच्या गटाला मार्गदर्शन केले.

त्यानंतर इ. ५ वी ते ७ वी वर्गांनी विविध बौद्धिक खेळ खेळले. सर्व खेळात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले.

## ६.४ अग्रणी तासिका

संवाद, स्वयंअध्ययन, सादरीकरण, गटकार्य व बांधणी या कौशल्यांचा विकास होण्याकरिता दर शुक्रवारी अग्रणी नेमून दिलेल्या वर्गावर एक तासिका घेतात. सामाजिक विकसन व प्रबोधिनीपण या विषयांवर अग्रणीनी वर्षभर आपल्या वर्गांसामोर मांडणी केली. दृकश्राव्य साधने, गटकार्य, गटचर्चा, व्याख्यान इ. माध्यमांचा वापर त्यांनी यावेळी केला. या बरोबरच आपल्या वर्गाचे सहाध्यायदिन योजण्यात अध्यापकांना मदत केली.

## ७. अध्यापक प्रशिक्षण व बैठका

### अध्यापक प्रशिक्षण शिबिर (६ ते ८ जून २०२४)

| दिनांक | सत्राचे नाव / वक्ते |
|---|---|
| ०६/०६/२०२४ | १. प्रबोधिनीचा इतिहास - मा. सुभाषराव देशपांडे<br>२. बुद्धिमान विद्यार्थ्यांची लक्षणे - मृण्मयीताई वैशंपायन<br>३. विद्यार्थी निरीक्षणे १ - मृण्मयीताई वैशंपायन<br>४. प्रशाला ओळख भाग १ - हृषिकेशदादा कुलकर्णी<br>५. सहविचार बैठक |
| ०७/०६/२०२४ | १. युवक-युवती विभागाचे व्यक्तिमत्त्व विकासातील महत्त्व-अखिलेशदादा कसबेकर<br>२. कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांची ओळख - अमेयदादा पांगारकर<br>३. विद्यार्थी निरीक्षणे २. मृण्मयीताई वैशंपायन<br>४. प्रशाला ओळख भाग २ - वाच. मुकुलिकाताई थत्ते |
| ०८/०६/२०२४ | १. अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत न्युरो सायन्सचे महत्त्व - प्रा. नरेंद्र बऱ्हाटे |

### ७.१ अध्यापक प्रशिक्षण शिबिर दि. २७-२८ डिसेंबर २०२४

**❊ विशेष सत्रे**

१. समूहगुण विकसन सत्र

२. पंचकोष परिचय - मा. आदित्य दादा शिंदे

३. अध्यापक सहाध्याय दिन - भारत इतिहास संशोधक मंडळ, राष्ट्रीय कोशिका विज्ञान केंद्र व वनस्पतिशास्त्र विभाग (SPPU), ज्ञान प्रबोधिनी तंत्रशाळा, शिवापूर

### ७.२ साप्ताहिक बैठका

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील पूर्ण वेळ अध्यापकांसाठी साप्ताहिक बैठकांचे नियोजन असते. यामध्ये प्रशालेतील कामकाजासाठी लागणाऱ्या तांत्रिक सूचना, कामे, एकत्रित प्रकारे करण्याच्या चर्चा, नव्या प्रयोगांची माहिती, वैचारिक अशा विविध विषयांचा समावेश असतो. २०२४-२५ शैक्षणिक वर्षातील अशा बैठकांचे विषयपुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|
| १. | ११/०६/२०२४ | प्रशाला नियमांविषयी चर्चा |
| २. | १८/०६/२०२४ | मा. संचालकांचे मार्गदर्शन |
| ३. | २५/०६/२०२४ | ज्ञान प्रबोधिनी प्रशाला कार्यसंकल्प - समजून घेणे आणि चर्चा |
| ४. | ०२/०७/२०२४ | प्रशाला नियम अंतिम निश्चिती |
| ५. | १६/०७/२०२४ | मा. संचालकांचे मार्गदर्शन |
| ६. | २३/०७/२०२४ | जपान येथे होणाऱ्या Gifted Education Conference मधील प्रस्तावित मांडणी-मृण्मयीताई वैशंपायन |
| ७. | ३०/०७/२०२४ | जपान येथे होणाऱ्या Gifted Education Conference मधील प्रस्तावित मांडणी-सौंगधदादा देशमुख |
| ८. | ०६/०८/२०२४ | १५ ऑगस्ट, स्वातंत्र्यदिन कार्यक्रम - नियोजन व खातेवाटप |
| ९. | १३/०८/२०२४ | इयत्ता दहावी पालक मुक्त संवाद |
| १०. | २०/०८/२०२४ | मा. संचालकांचे मार्गदर्शन |
| ११ | २९/०८/२०२४ | गणपती उत्सव - नियोजन व खातेवाटप |
| १२. | २४/०९/२०२४ | गणपती उत्सव कार्यक्रम व उपक्रम - शोध-बोध, प्रशालेच्या नव्या वास्तूविषयी मांडणी आणि चर्चा |
| १३. | ०१/१०/२०२४ | इयत्ता पाचवी पालक संवाद |
| १४. | ०८/१०/२०२४ | पाषाण येथील प्रशालेच्या वास्तूबद्दल चर्चा |
| १५. | १५/१०/२०२४ | कावेरी संस्थेत प्रस्तावित असणाऱ्या Gifted Education वरील Conference मध्ये होणाऱ्या सादरीकरणाचा सराव - श्रेयशदादा, मेघनाताई |
| १६. | २२/१०/२०२४ | सत्रान्त परीक्षा आणि निकालासंबंधी सूचना |
| १७. | २६/११/२०२४ | कोलकाता अभ्यास दौरा-विविध व्यक्ती आणि संस्था भेटीविषयी मांडणी आणि चर्चा |
| १८. | १७/१२/२०२४ | इयत्ता सहावी पालक संवाद दिन |
| १९. | २४/१२/२०२४ | इयत्ता नववी पालक संवाद दिन |
| २०. | ०८/०१/२०२५ | मा. रवी सावदेकर यांच्या कार्याचा परिचय, इयत्ता दहावी पालक संवाद दिन |

| अ.क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|
| २१. | २१/०१/२०२५ | मा. संचालकांचे मार्गदर्शन |
| २२. | २८/०१/२०२५ | इयत्ता सातवी पालक संवाद दिन |
| २३. | ०४/०२/२०२५ | इयत्ता पाचवी प्रवेश परीक्षा–प्रशाला सदस्यांचे खातेवाटप आणि सूचना, वर्षान्त निकालासंबंधी सूचना |
| २४. | ११/०२/२०२५ | मा. संचालकांचे मार्गदर्शन |
| २५. | १८/०२/२०२५ | इयत्ता पाचवी प्रवेश परीक्षा–प्रशाला आणि प्रज्ञा मानस संशोधिका सदस्य एकत्रित बैठक |
| २६. | २०/०२/२०२५ | इयत्ता आठवी पालक संवाद दिन |
| २७. | ०४/०३/२०२५ | प्रकल्प प्रदर्शन खातेवाटप, पाचवी प्रवेश परीक्षा शोध बोध |
| २८. | १३/०३/२०२५ | कृतज्ञता समारोह – दहावी मुले व पालक |
| २९. | १८/०३/२०२५ | कृतज्ञता समारोह – दहावी मुली व पालक |

# ८. यश

## ८.१ शालान्त परीक्षा – इ. १०वी निर्णय

## ८.२ स्पर्धांतर्गत

| आनंदाश्रम संस्था – स्तोत्र पाठांतर स्पर्धा | | |
|---|---|---|
| आर्या खेडकर | इ. ७ वी | पाचवा क्रमांक |

| आनंदाश्रम संस्था – नाट्यवाचन स्पर्धा | |
|---|---|
| वैयक्तिक – स्वरा गिजरे | इ. ८ वी |

| बालसंगीत तथा नृत्य महोत्सव (शास्त्रीय संगीत) | | |
|---|---|---|
| मुक्ता साठे | इ. ७ वी | उत्तेजनार्थ |

| डी.ई.एस. गटचर्चा स्पर्धा | | |
|---|---|---|
| निआ भुरके | इ. १० वी | प्रथम उपविजेती |

| COEP वक्तृत्व स्पर्धा | | |
|---|---|---|
| सर विश्वेश्वरैय्या स्मृति करंडक २०२४ | | |
| मल्हार परांजपे | इ. ९ वी | द्वितीय क्रमांक |

| रानडे वक्तृत्व स्पर्धा | | |
|---|---|---|
| निनाद गोखले | इ. ९ वी | द्वितीय क्रमांक |

| पुणे जि.प. क्रीडा स्पर्धा | | |
|---|---|---|
| हॅन्ड बॉल | इ. ९ वी व १० वी मुले | उपान्त्य फेरी |

| पुस्तक प्रकाशन | | |
|---|---|---|
| अनुश्री दोकरस | इ. ६ वी | Magical Mysteries |

| भक्तिगीत गायन स्पर्धा | | |
|---|---|---|
| निनाद गोखले | इ. ९ वी | द्वितीय क्रमांक |
| स्पृहा जोशी | इ. ६ वी | उत्तेजनार्थ |

## शाहीर हिंगे पोवाडा गायन स्पर्धा

**लहान गट –**

सिद्धी वाघोले, हिरणमयी सप्रे, मुक्ता साठे, नारायणी पुराणिक, आदिती गोसावी, आर्या खेडकर, अनवीता अवधूत, आराधना देशमुख, प्रियाली लवांडे, आराध्या जरे, रेवा क्षीरसागर, सई कृष्णकुमार, सिद्धी खेडकर, गिरिजा परांजपे

## श्रावणसरी पाऊस गीते स्पर्धा

| | | |
|---|---|---|
| निनाद गोखले | इ. ९ वी | प्रथम क्रमांक |

## राष्ट्रीय अवकाश दिन – प्रतिकृति स्पर्धा

पहिल्या राष्ट्रीय अवकाश दिनाच्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या प्रतिकृती स्पर्धेमध्ये ९वीतील तन्वी मुंढे व किआना चुत्तर यांना वयोगटात सर्वोत्तम ५ प्रतिकृतींमध्ये पारितोषिक मिळाले. त्यांनी चंद्रयान-३ च्या विक्रम लॅण्डर आणि त्यातील ChaSTE sensor यांची अनुक्रमे स्थिर व कार्यशील प्रतिकृती तयार केली.

## गीता जयंती निमित्त स्पर्धा

| सुभाषित पाठांतर स्पर्धा | | |
|---|---|---|
| श्लोक राणे | इ. ५ वी | प्रथम क्रमांक |
| मोक्षा भुजबळ | इ. ५ वी | तृतीय क्रमांक |

| सुंदर हस्ताक्षर स्पर्धा | | |
|---|---|---|
| शरयू सातकर | इ. ६ वी | प्रथम क्रमांक |
| सृजा देशपांडे | इ. ६ वी | द्वितीय क्रमांक |
| सीआ गोगटे | इ. ५ वी | तृतीय क्रमांक |
| तनिष्का खटवे | इ. ६ वी | उत्तेजनार्थ |

| संस्कृत गेयगान स्पर्धा | | |
|---|---|---|
| मोक्षा भुजबळ | इ. ५ वी | द्वितीय क्रमांक |

## बॉम्बे सायन्स टिचर असोसिएशन तर्फे आयोजित होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा

इयत्ता ६ वी मधील २७ विद्यार्थी (१६ मुलगे, ११ मुली) आणि इयत्ता ९ वी मधील ३ मुलगे प्रॅक्टिकल परीक्षेसाठी पात्र ठरले. तसेच सहावी मधील २६ आणि नववी मधील १९ विद्यार्थी प्रमाणपत्रासाठी पात्र ठरले आहेत. प्रशालेतील एकूण ८६ (सहावी ५३ आणि नववीतील २८ विद्यार्थी) परीक्षेसाठी बसले होते

✼ ग्राहक पेठेतर्फे आयोजित चित्रकला स्पर्धा शाळेअंतर्गत झालेल्या अ व ब गटातील निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थिनी खालीलप्रमाणे.

**गट अ –**

भक्ती गांधी–५ वी मुली, इरा काळे–५ वी मुली, मिती पेडणेकर–६ वी मुली, सनाया टाके–५ वी मुली

**गट ब –**

सुखदा निकम–७वी मुली, रमा भिसे–८ वी मुली, मनिका वांगीकर–८वी मुली

## दीपस्तंभ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे होणाऱ्या स्कूल संसद

दीपस्तंभ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे होणाऱ्या स्कूल संसदची प्राथमिक पात्रता फेरी पार करून आपल्या प्रशालेच्या पाचही विद्यार्थिनी अंतिम फेरीत पोहोचल्या आहेत.

यावर्षी या फेरीत सांघिक निवड न होता वैयक्तिक निवड होणार होती. त्यामुळे दिलेल्या नावांपैकी कोणीच निवडले गेले नाही असेही होऊ शकणार होते.)

**इयत्ता ९ वी मुली**

अनन्या आठल्ये, किआना चुत्तर, अनुष्का लडकत, पूर्वा जोशी, अविका आचार्य या सर्वांची निवड अंतिम फेरीसाठी झाली. शाळांनी पाठवलेल्या नावांपैकी सर्वांची निवड झालेली बहुधा प्रशालाच एकमेव शाळा असावी.

कियाना चुत्तर व अनुष्का लडकत यांच्या गटाने Best Party चे उत्तेजनार्थ बक्षीस मिळविले.

कियाना चुत्तरची निवड स्कूल संसद २०२४–२५ च्या Leader of Opposition करिता झाली आणि अनुष्का लडकतला Best Prime Ministerचे पारितोषिक मिळाले.

| गणित प्रभुत्व लेव्हल १ परीक्षा | | |
|---|---|---|
| स्तर | | |
| इयत्ता | मुले | मुली |
| ५ | १६ | ६ |
| ८ | १५ | ७ |
| इ. ५ वी – सर्वाधिक गुण – ६४/७५ | | |
| इ. ८ वी – सर्वाधिक गुण – ७५/७५ | | |

| रामकृष्ण मठ आयोजित स्पर्धा | | | |
|---|---|---|---|
| भक्तिगीत – गायन | | | |
| छोटा गट | स्पृहा साठे | इ. ६ वी | तृतीय क्रमांक |
| मोठा गट | अवनी भाले | इ. ८ वी | प्रथम क्रमांक |

| एकपात्री | | | |
|---|---|---|---|
| मोठा गट | अवनी भाले | इ. ८ वी | तृतीय क्रमांक |

| वक्तृत्व | | | |
|---|---|---|---|
| मोठा गट | इरा जोशी | इ. ८ वी | प्रथम क्रमांक |

| समूह गायन | |
|---|---|
| द्वितीय क्रमांक | स्पृहा साठे, अवनी भाले, सान्वी कुयरे, साईशा बोडके, आनंदी भट, सई लिमये, सानिका वांगीकर |

| लघु नाटिका | |
|---|---|
| तृतीय क्रमांक | स्पृहा साठे, स्वरा गिजरे, अवनी भाले, इरा जोशी, सान्वी कुयरे, आर्या खेडकर, प्रीता कुलकर्णी, चिन्मयी मांडके, अस्मी कुलकर्णी, सिआ गोगटे, प्रांजल झोडगे |

## शारदा मठ आयोजित

| | | |
|---|---|---|
| समूह गीत | इ. ७ वी मधील विद्यार्थिनी | प्रथम क्रमांक |

### सहभागी विद्यार्थिनी

सानवी नाईक – तबला, हिरण्मयी सप्रे –पेटी

समूह गान – जुई काळे, आर्या खेडकर, सिद्धी खेडकर, नारायणी पुराणिक, जान्हवी भोसले, प्रणवी हाजीरनीस, गिरीजा परांजपे, अदिती गोसावी, मुक्ता साठे, काव्या सरोदे

## आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा

| | | | |
|---|---|---|---|
| **लहान गट** | | | |
| मराठी कविता पाठांतर | अर्णव अयाचित | इ. ५ वी | तृतीय क्रमांक |
| हिंदी कविता पाठांतर | सिआ गोगटे | इ. ५ वी | द्वितीय क्रमांक |
| | प्रबुद्ध जैन | इ. ६ वी | चतुर्थ क्रमांक |
| इंग्रजी कविता पाठांतर | अनिका कर्वे | इ. ६ वी | पाचवा क्रमांक |
| मराठी कथाकथन | ऋत्वा देवधर | इ. ६ वी | सहावा क्रमांक |
| मराठी समयस्फूर्त | स्पृहा साठे | इ. ६ वी | द्वितीय क्रमांक |
| | अस्मि कुलकर्णी | इ. ६ वी | पाचवा क्रमांक |
| **मध्यम गट** | | | |
| मराठी कविता पाठांतर | अदिती गोसावी | इ. ७ वी | पाचवा क्रमांक |
| हिंदी कविता पाठांतर | अदिती गोसावी | इ. ७ वी | सहावा क्रमांक |
| इंग्रजी कविता पाठांतर | स्वरा गिजरे | इ. ८ वी | द्वितीय क्रमांक |
| मराठी नियोजित | स्वरा गिजरे | इ. ८ वी | द्वितीय क्रमांक |
| इंग्रजी नियोजित | सई आंबेकर | इ. ७ वी | तृतीय क्रमांक |
| मराठी समयस्फूर्त | सई आंबेकर | इ. ७ वी | तृतीय क्रमांक |
| **मोठा गट** | | | |
| इंग्रजी उतारा पाठांतर | मल्हार परांजपे | इ. ९ वी | तृतीय क्रमांक |
| मराठी समयस्फूर्त | वैभवी बिन्नीवाले | इ. ९ वी | सहावा क्रमांक |

## श्री समर्थ रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड आणि अक्षर रसिक सुलेखन वर्ग पुणे आयोजित सुंदर हस्ताक्षर स्पर्धा

आपल्या प्रशालेतील इ. ५ वी ते ८ वी (सर्व) विद्यार्थी – विद्यार्थिनीचा गट सहभागी झाला होता.
विजेत्या स्पर्धकांची नावे पुढीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | शरयू सुखदेव सातकर | इ. ६ वी |
| द्वितीय क्रमांक | विराज शरद तळेकर | इ. ७ वी |
| तृतीय क्रमांक | अद्वय सचिन फडतरे | इ. ७ वी |

| गणित प्रभुत्व स्पर्धा लेव्हल २ रिझल्ट |
| --- |
| **इ. ५ वी** |
| गट १ (Scholarship + Medal + Certificate)<br>अर्णव बनकर, आरव जोशी, आदित्य शिंदे |
| गट २ (Medal + Certificate)<br>राघव डोळस, भूमी गांधी, आरुष फटके, आदित्य साठे |
| गट ३ (Certificate)<br>ईशान गद्रे, शंतनू लांडगे, अद्वय लिगम, आराध्य नेवसे, आर्या राजहंस, पूर्वा शिंगटे |
| **इ. ८ वी** |
| गट १ (Scholarship + Medal + Certificate)<br>सर्वेश कोल्हे, ओजस तपस्वी |
| गट २ (Medal + Certificate)<br>अवनी गौरकर, अमोघ गुजराथी, सनराज खोरे, तेजश्री कुलकर्णी, ऋतुजा पाटील, सनत प्रतिनिधी |
| गट ३ (Certificate)<br>अद्वित भिलेगावकर, सोम चौधरी, प्रियाशा देशमाने, तनिष्का नेरकर |

# ९. विशेष दखल

## ९.१ वर्गश: संचालक भेटी

'मनुष्यघडणीसाठी शिक्षण'या उद्दिष्टानुरूप ज्ञान प्रबोधिनी प्रशाला कार्यरत आहे. देशप्रश्न सोडवणारे कार्यकर्ते तयार व्हावयासाठी इथली शिक्षणप्रणाली काम करते. हे काम सुरळीत चालू राहावे यासाठी ज्येष्ठांचे मार्गदर्शन हवेच. आदरणीय संचालकांनी प्रशालेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. संवादात खालील विषयांची मांडणी केली.

| वर्ग | दिनांक | साधारण तपशील |
|---|---|---|
| इ. ५ वी मुली | ०१/१०/२०२४ | संचालक म्हणून माझे काम काय, प्रबोधिनीचं कार्य आणि विस्तार, प्रबोधिनीचे विद्यार्थी म्हणून असलेल्या अपेक्षा, उत्तमता म्हणजे काय इ. वर मार्गदर्शन केले. |
| इ. ५ वी मुले | | |
| इ. ६ वी मुली | २४/०९/२०२४ | 'मेन्सा' या संस्थेचे कार्य, आ. आप्पांचे त्यासाठीचे योगदान, बंगलोर दौऱ्यावेळच्या प्रबोधिनी परिवारातल्या सदस्यांच्या भेटीगाठी, त्यांना मिळालेलं प्रबोधिनीपण. |
| इ. ६ वी मुले | | |
| इ. ७ वी मुली | १३/०८/२०२४ | 'रूप पालटू देशाचे' या पद्याविषयी चर्चा, वेद, ऋचा इ. चे महत्त्व, एकत्रित राहणे आणि एकविचाराचे महत्त्व समजावले. |
| इ. ७ वी मुले | २०/०८/२०२४ | १. महाकुंभ (परिस्थिति समजून घेणे), महाकुंभ आणि आपली संस्कृती याबद्दल संवाद साधला.<br>२. 'हिंदू ऐक्याची ध्वजा' या पद्यावर आ. संचालकांनी निरूपण केले. त्यामध्ये भगवा ध्वज तो त्यागाचे प्रतीक तर जरीपटका हे ऐश्वर्य आणि भरभराटीची प्रतीक याबद्दल पद्यामध्ये कोणकोणत्या ओळी आहेत यावर चर्चा झाली. भगवा ध्वज आणि जरीपटका हे दोन्ही ध्वज यांचे महत्त्व सांगितले. |
| इ. ८ वी मुली | | |
| इ. ८ वी मुले | | |
| इ. ९ वी मुली | ०४/०३/२०२४ | विद्याव्रत जोपासना, त्यासाठी आवश्यक गुण इ. वर मार्गदर्शन केले. |

| वर्ग | दिनांक | साधारण तपशील |
|---|---|---|
| इ. ९ वी मुले | ०२/०७/२०२५ | १) Intelligence, Competence, Motivation, Ability to do organized work या प्रत्येकावर भाष्य.<br>२) विद्याव्रत पोथीमधील श्लोकांमधील श्रद्धा, मेधा, यश, प्रज्ञा, विद्या, बुद्धी या संकल्पनांवर भाष्य. |
| इ. १० वी मुली | १८/०६/२०२४ | १) हायअबिलिटीइक्विटी,  इन्क्लूजन याबद्दल मांडणी<br>२) 'धर्मविचार आणि ईशचिंतन यात सनातनातील सनातनी आणि उद्योग व शास्त्रविचार यात आधुनिकातील आधुनिक' अशा प्रबोधिनीच्या व्याख्येबद्दल स्पष्टीकरण. |
| इ. १० वी मुले | २५/०६/२०२४ | 'अनुभव' या विषयावर संवाद अनुभवांचे ४ प्रकार – पराक्रम/ कर्तृत्व, इतरांना मदत, प्रसन्नता /आनंद व प्रेरणा याबद्दल स्वानुभवांतून विश्लेषण |

## ९.२ प्रशालेस मान्यवरांनी दिलेल्या भेटी

०९/०८/२०२४ रोजी डॉ. शिल्पा मनोज्ञा, डॉ. व्ही. सी. चव्हाण, डॉ. अमृता, (पदाधिकारी, एन.सी.इ.आर.टी.) यांनी ज्ञान प्रबोधिनीला भेट दिली.

प्राचार्य मिलिंदराव नाईक, वाच. मनोजराव देवळेकर, वाच. अनघाताई लवळेकर, वाच. सुजलताई वाटवे आणि वाच. उषा ताई खिरे यांच्याशी संवाद साधून प्रबोधिनीबद्दल आणि प्रबोधिनीतील बुद्धिवंतांच्या शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाबद्दल त्यांनी माहिती जाणून घेतली.

प्रशालेतील उपक्रम आणि बुद्धिवंतांच्या शिक्षण प्रकियांबद्दल विशेष जाणून घेतले. वाच. मुकुलिकाताई थत्ते, मृण्मयीताई वैशंपायन, क्षमाताई दातार, ईशाताई कान्हेरे यांनी विविध उपक्रम आणि कामांची माहिती सादर केली. विविध प्रयोगशाळा, धडपड प्रयोगशाळा, अभिव्यक्ती कक्ष, ग्रंथालय, संत्रिका विभागाला या गटाने भेट दिली.

एन.सी.इ.आर.टी आणि ज्ञान प्रबोधिनी मिळून शिक्षक प्रशिक्षण, प्रज्ञावंतांचे शिक्षण इ. विषयांवर भविष्यात एकत्रित कसे काम करता येईल यावर यावेळीचर्चा झाली.

✻ दिनांक १९/१२/२०२४ रोजी मा. राधिका सिंग, (Chishlom TAFE institute, Melbourne) यांनी ज्ञान प्रबोधिनी प्रशालेला भेट दिली.

प्रशालेतील उपक्रम आणि शिक्षण प्रकियांबद्दल त्यांनी जाणून घेतले. विविध प्रयोगशाळा, धडपड प्रयोगशाळा, अभिव्यक्ती कक्ष, ग्रंथालय, शैक्षणिक साधन केंद्र आणि संत्रिका विभागाला भेट दिली.

समारोपाच्या वेळी आदित्य दादा पोंक्षे आणि वाच. अजितराव कानिटकर यांचीही भेट झाली.

**प्रासंगिक**

**✻ संस्कृत सप्ताह**

**व्याख्यान**

संस्कृत सप्ताहाच्या निमित्ताने दि. २२ ऑगस्ट २४ यादिवशी इ. ९ वी व १० वी या दोन वर्गांसाठी 'भारतीय ज्ञान परंपरा'या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. माधवी गोडबोले यांना निमंत्रित केले होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणपद्धतीत अपेक्षित असलेल्या बदलांविषयी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. भारतातील वैशिष्ट्यपूर्ण प्राचीन बांधकाम, तसेच कोरीव काम अशोकस्तंभ, हडप्पा संस्कृती इ. उदाहरणावरून शाश्वत विकासासाठी सोळा ध्येयांचा आढावा घेताना पृथ्वी सूक्ताचाही त्यांनी उल्लेख केला. जर्मनीत एका चिकित्सालयात पूर्णपणे आयुर्वेदावर आधारित उपचार केले जातात, अशी माहिती दिली. कोणत्याही प्रकारचे ज्ञान प्राप्त करण्याचा अधिकार समाजातील प्रत्येक व्यक्तीला असायचा हे एका युद्धाच्या कथेतून सांगितले. विशिष्ट विषयाचे ज्ञान देण्यासाठी सुमारे ५५ ते ६० विद्यापीठे उपलब्ध होती असेही सांगितले. ज्ञानप्राप्ती केल्यानंतर गुरुदक्षिणा देण्याची पद्धत होती. शेवटी भारतीय ज्ञान परंपरा हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यामागचा हेतू सांगून मूळ ग्रंथांचे वाचन केल्यास या विषयातील संशोधन वाढेल, असे त्या म्हणाल्या.

**⁕ छात्र प्रबोधन विक्री मार्गदर्शन**

इयत्ता पाचवी ते सातवी विद्यार्थी विद्यार्थिनींच्या विक्री कौशल्य विकसनासाठी छात्र प्रबोधन विक्री उपक्रमाची योजना केली. त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यासाठी शुक्रवार दि. ६ सप्टेंबर २४ रोजी एक प्रशिक्षण सत्र झाले.

यामध्ये मार्गदर्शन देण्यासाठी रुपालीताई बापट आणि शिल्पताई कुलकर्णी उपस्थित होत्या. अंक सर्वांपर्यंत पोहोचवणे का आवश्यक आहे, त्यासाठी संवाद कसा साधायचा, जास्तीत जास्त लोकांपर्यंत अंक पोचण्यासाठी काय करता येईल अशा मुद्द्यांवर आधारित मार्गदर्शन केले.

**ज्ञानप्रबोधिनी प्रशाला ग्रंथालय– ग्रंथ प्रदर्शन**

**⁕ ग्रंथालय वार्षिक वृत्त**

आपले ग्रंथालय हे माहिती आणि शिक्षणाचे केंद्र आहे. ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे  ई–संसाधनाच्या स्वरूपात आपले ग्रंथालय अद्ययावत माहिती प्रदान करते. या शैक्षणिक वर्षात विविध विषयांवरील ३५० नवीन पुस्तके ग्रंथालयासाठी खरेदी केली आहेत, तसेच चार नवीन नियतकालिकांची वर्गणी भरली आहे.

**⁕ ग्रंथालय परिचय सत्र**

'पाचवीत नव्याने प्रशालेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय परिचय सत्र दरवर्षी घेतले जाते. ग्रंथालयाचे नियम, ग्रंथालयातल्या सुविधा, संदर्भ ग्रंथ कक्ष, पुस्तक देवघेव कशी करायची, ग्रंथालयाच्या स्मार्ट आयडी कार्डचा वापर कसा करावा, तसेच ग्रंथालयाचे सॉफ्टवेअर कसे वापरायचे याबद्दल संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना दिली. जेणेकरून इयत्ता पाचवीच्या  विद्यार्थ्यांनाही ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर करता येईल. वृत्तपत्र वाचन उपक्रम – दररोज वर्तमानपत्रे वाचणे ही एक चांगली सवय प्रत्येक विद्यार्थ्याने जोपासली पाहिजे. कारण वर्तमानपत्र वाचण्याचे अनेक फायदे आहेत; जे विद्यार्थ्यांना अष्टपैलू बनवण्यात, शैक्षणिक आणि करिअरमध्येही प्रगती करण्यास मदत करतात. हे लक्षात घेऊन प्रशालेतर्फे इयत्ता आठवी, नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्गात तीन वर्तमानपत्रे–लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, टाइम्स ऑफ इंडिया (दोन मराठी व एक इंग्रजी) चालू केली आहेत. सहा वर्गांना या योजनेचा लाभ होत आहे.

**⁕ वाचन प्रेरणा दिन**

१५ ऑक्टोबर हा दिवस भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी केली जाते. या दिवसाचे औचित्य साधून ग्रंथालयात माननीय डॉ. अब्दुल कलाम यांच्या पुस्तकांचा संग्रह ग्रंथालयात स्टँडवर प्रदर्शित केला गेला. यामुळे डॉक्टर अब्दुल कलाम यांच्या पुस्तकांचा मुलांना परिचय झाला.

**⁕ बुक मार्क तयार करणे उपक्रम**

इ. सहावी मुलींच्या वर्गात जाऊन वाचनाचे महत्त्व तसेच बुकमार्कविषयी माहिती आणि महत्त्व सांगितले. बुकमार्क कसे तयार करायचे ते सांगितले सहावीच्या मुलींनी बुकमार्क तयार करण्याच्या कामात खूप उत्साहाने सहभाग घेतला. ग्रंथालयाने मुलींना फक्त एक सारख्या आकाराचे कार्डशीट दिले होते. मुलींनी वेगवेगळी रंगसंगती वापरून, कल्पकता वापरून, छान सुविचार लिहून ४०० उत्तम व देखणे बुक मार्क तयार

करून दिले. याचा वापर येत्या वर्षात मराठी पुस्तकांसाठी केला जाणार आहे. आपल्या ग्रंथालयात आधुनिक वातावरण आहे आणि कार्यक्षम सेवा व सुविधा प्रदान करण्याचा नेहमी प्रयत्न करत असतो.

## कार्यक्षेत्र मार्गदर्शन कार्यशाळा

**❊ कर्मचारी सदस्य सहल**

**सहल वृत्त दिनांक १८/०५/२०२४**

आज सकाळी आम्ही स्वामी विवेकानंद पुरममध्ये निवासाला होतो, आमच्या दौऱ्याचा मुक्कामाचा पहिला दिवस सकाळी लवकर उठून आवरून विवेकानंद पुरममधील बीच जवळ सूर्योदय पाहण्यासाठी सकाळी सहा वाजून पाच मिनिटांनी पोहोचलो. या ठिकाणी सूर्योदय पाहिला सूर्योदय पाहण्याची जागा समुद्रकिनारी असल्याने (निवासापासून एक किमी अंतरावर) सकाळ आमची खूपच ऊर्जावर्धक झाली. सकाळी सूर्योदय पाहून आम्ही जवळच एकनाथजींच्या समाधीजवळ विवेकानंदांच्या पुतळ्यासमोर उपासना केली आणि माननीय एकनाथजींच्या समाधीचे दर्शन घेतले. आठपर्यंत आवरून न्याहारी करून आम्ही नऊ वाजता विवेकानंद शीला स्मारक पाहण्यास निघालो. विवेकानंद पुरम केंद्रातून नऊ पंधरा वाजता विवेकानंद पुरममधून रॉक मेमोरियल करिता बस निघाली दहा वाजता आम्ही विवेकानंद शिला स्मारकावर पोहोचलो. माननीय यांनी शिलास मार्गाची आणि एकनाथजींची माहिती सांगितली व त्यांच्या जीवनावर लघुपट दाखवला. शिला स्मारकावर देवी कन्याकुमारीचे पाऊल, शीला स्मारक यामध्ये विवेकानंद जिथे तीन दिवस ध्यानाला बसले. ती जागा आम्हाला पाहता आली. या ठिकाणी स्मारक, विवेकानंदांचा पुतळा, ध्यानगृह पाहिले. ध्यानगृहात आम्ही काही वेळ ध्यान केले. काही वेळ परिसर पाहून फोटोशूट केले. सोबत पुस्तक विक्री केंद्रावर पुस्तके पाहता आली. शेजारी तिरुवल्लूवर यांचा पुतळा पाहिला, जे कन्याकुमारी मधील तिरुकुअल या ग्रंथाचे लेखक आहेत आणि तमिळ साहित्यातील सर्वोत्कृष्ट कवी आहेत त्यांचा १३३ फूट पुतळा जो ३८ फूट चौथ्यावर उभा आहे. तो पुतळा मला पाहता आला. रॉक मेमोरियल पाहून झाल्यावर आम्ही साडेअकरा वाजता पुन्हा विवेकानंद केंद्रावर परतलो. दुपारचे भोजन आम्हाला कार्यकर्त्यांच्या सोबत कार्यकर्ता भोजनगृहाचे आमंत्रण मिळाले होते. या ठिकाणी दुपारचे भोजन करून आम्ही थोडा वेळ विश्रांती घेतली. पुन्हा साडेतीन वाजता कन्याकुमारीकडे परतलो. चार वाजता आम्ही देवी कन्याकुमारी मंदिर पाहायला गेलो. धार्मिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण स्थळांपैकी एक असणारे मंदिर ५१ शक्तिपीठांपैकी एक आहे. पाहण्यास आम्हाला मिळाले. त्यानंतर त्रिवेणी संगमावर आम्ही गेलो. तिथे जवळच असणारा त्रिवेणी संगम आम्हाला खूप विलोभनीय वाटला. या ठिकाणी तीन समुद्र एकत्र येतात म्हणून याला त्रिवेणी संगम म्हटलं जातं. बंगालचा उपसागर, हिंद महासागर आणि अरबी समुद्र या त्रिवेणी संगमावर आम्ही बराच वेळ घालवला. यानंतर गांधी मंडपकडे आम्ही निघालो. गांधी मंडप ठिकाणी गांधीजींच्या अस्थिकलश ठेवण्यात आला होता. नंतर ते अवशेष त्रिवेणी संगमात पुरण्यात आले. ते ठिकाण गांधी मंडप म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी गांधीजींच्या छायाचित्रांचे संग्रहालय आहे. सोबत स्वातंत्र्यपूर्व काळातील मासिके, पुस्तके आणि अनेक ग्रंथ असणारे ग्रंथालय आहे. ग्रंथालयाला या दिवशी सुट्टी असल्याने आम्हाला ते पाहता आले नाही. गांधी मंडप पाहून

झाल्यावर आम्ही जवळच असणारा लाईट हाऊस पाहायला निघालो. थोडा वेळ चालून गेल्यावर उंच ठिकाणी लावून लाईट हाऊस पाहायला मिळाला. याची याला तिकीट आहे. तिकीट काढून आम्ही सर्व जवळपास चार-पाच मजली इमारतीची उंची असणारा हा लाईट हाऊस आम्हाला वरती जाऊन पाहता आला. कन्याकुमारी शहराचा संपूर्ण view या ठिकाणावरून दिसतो. आम्ही अनेकांनी तिथे छायाचित्रे काढली. व्हिडिओ बनवले, अनेकांनी आपल्या कुटुंबियांना व्हिडिओ कॉल करून कन्याकुमारी दाखवण्याचा प्रयत्न केला. इत्यादी ठिकाणे पाहून झाल्यावर आम्ही संध्याकाळी सहा वाजता पुन्हा विवेकानंद पुरम म्हणजे विवेकानंद केंद्राकडे निघालो. सहा वाजता आम्ही केंद्रावर पोहोचलो. तिथे काही कार्यकर्त्यांची भेट झाली आणि आठ वाजता आम्ही भोजनासाठी भोजनगृहात गेलो. भोजन झाल्यानंतर दिवसभराचा आढावा घेण्यासाठी आम्ही त्याच ठिकाणी छोटी बैठक घेतली. या बैठकीमध्ये दिवसभरात जे जे काही पाहिलं त्याबाबत आम्ही थोडी सविस्तर चर्चा केली. आपल्याला काय योग्य वाटलं काय छान वाटलं काय वेगळं वाटलं यावर सर्वांनी भरभरून बोलले आणि याच ठिकाणी प्रार्थना घेऊन आम्ही पुन्हा नऊ वाजता निवासाच्या ठिकाणी परतलो.

**सहनिवास वृत्त (मुले)**
**सहनिवास वृत्त (मुली)**

**⁕ सहनिवास अभ्यासिका**

प्रशालेतील सहनिवासात राहणाऱ्या मुलींना घरासारखे वैयक्तिक मार्गदर्शन उपलब्ध नसते. ही कमतरता लक्षात घेऊन शाळेतच त्यांच्या अभ्यासातील अडचणी सोडवून घेतल्या जाव्यात व त्यांचा अभ्यासक्रम आणि गृहपाठ पूर्ण व्हावा या उद्देशाने प्रशालेत स्वतंत्र अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे.

या सहनिवासात राहणाऱ्या विद्यार्थिनींसाठी जून ते मार्च या कालावधीत सकाळ व संध्याकाळ अभ्यासिका वर्ग तसेच इंग्रजी व गणित विषयाचे सराव वर्ग आयोजित केले गेले.

या उपक्रमात पाचवी ते आठवी या वर्गांमधील एकूण ३० विद्यार्थिनींसाठी ३ मार्गदर्शकांची नियुक्ती करण्यात आली. या सत्रांमध्ये स्वयंअध्ययनावर भर देण्यात आला. तसेच संस्कृत, इंग्रजी व गणित या विषयासाठी गरजेनुसार स्वतंत्र तासिकांचे नियोजन करण्यात आले.

# १०. कृतज्ञता

**✻ शालेय शुल्क शिष्यवृत्ती**

विविध शालेय व सहशालेय उपक्रमांची रेलचेल असूनही आपल्या प्रशालेचे शालेय शुल्क इतर शाळांच्या तुलनेत कमी आहे. हे आपण आपल्याकडे सर्व आर्थिक व सामाजिक स्तरांतून विद्यार्थी-विद्यार्थिनी यावेत म्हणून अवलंबिलेले धोरण आहे. तरीही निवड झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये आहे ते शुल्क भरण्याचीही अडचण असलेले अनेकजण असतात. विशेषत: ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना शालेय व सहनिवास असे दोन्ही शुल्क भरायचे असल्याने आर्थिक अडचण असते. त्यामुळे आपल्या निवड चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या कोणताच विद्यार्थी-विद्यार्थिनी प्रशालेतील विशेष शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून आपण अशा विद्यार्थी-विद्यार्थिनींना जास्तीत जास्त आर्थिक मदत करत असतो. मनुष्यघडण व वृत्तीघडण हे प्रमुख उद्दिष्ट समोर ठेवून शिक्षण क्षेत्रात कार्य करत असल्याने निवड झाल्यानंतर आर्थिक अडचण हा प्रवेशासाठी कधीच अडथळा ठरत नाही. अशा मुलांसाठी आर्थिक शिष्यवृत्तीचे अर्ज भरून घेतो. त्याबरोबर उत्पन्नाचा दाखला व इतर विशेष खर्चाची कागदपत्रे दाखल करून घेतो. २-३ सदस्यीय समिती या सर्व अर्जांची छाननी करून, गृहभेट व पालकांची मुलाखत घेऊन शिष्यवृत्तीची रक्कम निश्चित केली जाते. अशा सढळ हाताने देणगी देणाऱ्या हितचिंतकांच्या आधारे प्रशालेमधील अनेक नावीन्यपूर्ण उपक्रमही चालतात. या सर्व हितचिंतकांची प्रशाला मन:पूर्वक आभारी आहे. प्रशालेतील प्रयोगशीलता व स्वायत्तता टिकण्यामागे आपला सर्वांचा मोलाचा हातभार आहे. आपले मन:पूर्वक धन्यवाद!

इ.५वी ते १०वी मधील एकूण २२ विद्यार्थी-विद्यार्थिनींना या वर्षी एकूणात रु.१३,४४,२९० रकमेची शिष्यवृत्ती दिली गेली.

## २०२४-२५ या वर्षात देणगी देणारे हितचिंतक

| | | | |
|---|---|---|---|
| १) प्रबोध अर्थसंचय प्रा. लि. | २०००००/- | १५) रेखा आर. चिपळूणकर | १०००००/- |
| २) शशांक मनोहर चांदोरकर | २०००००/- | १६) शीला लिमये | १०००००/- |
| ३) अभा गोखले गोडबोले | १५००००/- | १७) अमित घैसास | १०००००/- |
| ४) शलाका मेहता | १२१७२७/- | १८) नरेंद्र अँड अनीता देशमुख | १०००००/- |
| ५) मंदार गोडबोले | १११०००/- | १९) डॉ. आर. सी. ए. गोडबोले | १०००००/- |
| ६) हेमंत करंदीकर | १०५०००/- | २०) सुहासिनी साठे | १०००००/- |
| ७) सचिन गाडगीळ | १०५०००/- | २१) नम्रता जे. दळवी | ७५००१/- |
| ८) लेट एस .एम. अभ्यंकर | १००००१/- | २२) प्रकाश एन. घाटे | ७५०००/- |
| ९) अपूर्वा इनामदार | १००००१/- | २३) विभाकर के. मिरजकर | ६००००/- |
| १०) सई अभिजीत चिपळूणकर | १०००००/- | २४) मिलिंद संत | ५१०००/- |
| ११) धनंजय के. केसकर | १०००००/- | २५) हृषीकेश साठे | ५००००/- |
| १२) विभाकर के. मिरजकर | १०००००/- | २६) अमित फडके | ५००००/- |
| १३) मिलिंद संत | १०००००/- | २७) प्रकाश वाटवे | ५००००/- |
| १४) प्रभंजन सामक | १०००००/- | २८) डॉ आदिती गुजराथी | ५००००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २९) डॉ. मिलिंद मोडक | ५००००/– | ६४) सागर कानडे | १५००१/– |
| ३०) डॉ. धनंजय एस. केळकर | ५००००/– | ६५) राहुल पी. जोशी | १५०००/– |
| ३१) जयंत आठले | ५००००/– | ६६) निनाद सी. प्रधान | १५०००/– |
| ३२) सत्यजित बडवे | ५००००/– | ६७) संजय व्ही. बर्वे | १५०००/– |
| ३३) अतुल जोगळेकर | ५००००/– | ६८) समीर एम. गांधी | १५०००/– |
| ३४) केदार शुक्ला | ५००००/– | ६९) राहुल नांगरे | १५०००/– |
| ३५) आदित्य केळकर | ५००००/– | ७०) आनंद एस. पारखी | ११११११/– |
| ३६) मंदार जे. देवगावकर | ५००००/– | ७१) सलिल रणदिवे | ११००१/– |
| ३७) रवी एस. आवले | ५००००/– | ७२) सुनील एस. दाढे | ११००१/– |
| ३८) यशश्री कुलकर्णी | ४००००/– | ७३) उमा विश्वनाथन | ११०००/– |
| ३९) वैशाली चौधरी | ४००००/– | ७४) अमेय एस. नवरे | ११०००/– |
| ४०) प्रीती एच. मुळीक | ३४३००/– | ७५) राजेश धर्माधिकारी | ११०००/– |
| ४१) नम्रता जे. दळवी | २५०००/– | ७६) राघवेनदर एस. पोंक्षे | ११०००/– |
| ४२) सुरेश फडके | २५०००/– | ७७) अतुल व्ही. एडलाबादकर | ११०००/– |
| ४३) माधवी सहस्त्रबुद्धे | २५०००/– | ७८) प्रत्युमा कामत | १०००१/– |
| ४४) संजीवनी फाटक | २५०००/– | ७९) शेरीने मेहता | १००००/– |
| ४५) तुषार कानडे | २५०००/– | ८०) अलका आर. पटवर्धन | १००००/– |
| ४६) प्रद्युमन वैद्य | २५०००/– | ८१) अशोक विद्यालय | १००००/– |
| ४७) डॉ. मृणालिनी मोघे | २५०००/– | ज्युनियर कॉलेज | |
| ४८) डॉ. अश्विनी जोशी | २५०००/– | ८२) वर्षा एस. नातू | १००००/– |
| ४९) डॉ. जयेश राहाळकर | २५०००/– | ८३) सचिन खोत | १००००/– |
| ५०) डॉ. गिरीश गोडबोले | २५०००/– | ८४) माधव के. पुराणिक | १००००/– |
| ५१) डॉ. सचिन गांधी | २५०००/– | ८५) माधव के. पुराणिक | १००००/– |
| ५२) डॉ. उत्क्रांत कुरलेकर | २५०००/– | ८६) डॉ. सुनील गोडबोले | १००००/– |
| ५३) राहुल धर्माधिकारी | २५०००/– | ८७) डॉ. शीतल गायकवाड | १००००/– |
| ५४) नितीन राजहंस | २५०००/– | ८८) मयुरेश फडके | १००००/– |
| ५५) अखिलेश कसबेकर | २५०००/– | ८९) अद्वैत जोशी | १००००/– |
| ५६) अभिजीत लिमये | २५०००/– | ९०) रवींद्र एस. जगताप | १००००/– |
| ५७) विक्रम कामठे | २५०००/– | ९१) डॉ. अमित वाळिंबे | १००००/– |
| ५८) अमित पी. गोडबोले | २१०००/– | ९२) प्रतीक पतकी | १००००/– |
| ५९) धनंजय देशमुख | २१०००/– | ९३) आनंद बी. राव | १००००/– |
| ६०) शिरीष सी. देशमुख | २१०००/– | ९४) सुरेन्द्र वाटवे | १००००/– |
| ६१) युतीका पटवर्धन | २१०००/– | ९५) मानसी गोळे | १००००/– |
| ६२) चारुदत्ता राणे | २००००/– | ९६) विवेक फडके | १००००/– |
| ६३) सुशांत पवार | १६७००/– | ९७) नरेंद्र कुलकर्णी | १००००/– |

९८) आदित्य पी. सोमण १००००/-
९९) आनंद पाध्ये १००००/-
१००) विद्यावती नायक ७०२१/-
१०१) सारंग डी. खरे ६००१/-
१०२) शाश्वती देशमुख ५००१/-
१०३) राहुल व्ही. रावत ५००१/-
१०४) अर्चना शारंगपाणी ५०००/-
१०५) अनुज अजय ससाणे ५०००/-
१०६) शिरीष पाणदरे ५०००/-
१०७) ममता काखांदीकि ५०००/-
१०८) गायत्री ए. सेवक ५०००/-
१०९) हर्ष भोगले ५०००/-
११०) मिलिंद बी. उपळविकर ५०००/-
१११) संजीव केळकर ५०००/-
११२) मेधाविनी वाटवे ५०००/-
११३) राजेश भिडे ५०००/-
११४) अजय फाटक ५०००/-
११५) मानसी रावत ५०००/-
११६) अनिल देशमुख ५०००/-
११७) सुमित फडणीस ५०००/-
११८) अश्विनी देशपांडे ५०००/-
११९) षण्मुखानंद सावंत ५०००/-
१२०) शिवशक्ती पेंट ५०००/-
१२१) श्रेयश फापाळे ४०००/-
१२२) अमृत सामक ३५००/-
१२३) नीलेश गावंडे ३५००/-
१२४) योगिता गावंडे ३५००/-
१२५) अनवी पी. धामणे ३५००/-
१२६) अस्मिता भू. वैशंपायन ३५००/-
१२७) राहुल पाटील ३५००/-
१२८) अनिरुद्ध व्ही. जाधव ३५००/-
१२९) स्वाती चौगुले ३५००/-
१३०) रूपाली कुलकर्णी ३५००/-
१३१) सचिन आर. जाधव ३५००/-
१३२) जयेश आपटे ३५००/-
१३३) भास व्ही. भामरे ३५००/-
१३४) मनीषा एस. निकम ३५००/-
१३५) प्रणाली चौधरी ३५००/-
१३६) सारंग मेटकर ३५००/-
१३७) सचिन अहिरराव ३५००/-
१३८) विठ्ठल व्याळजी ३५००/-
१३९) आदित्य आपटे ३५००/-
१४०) सुप्रिया देवरे ३५००/-
१४१) अमृता एन. चौधरी ३५००/-
१४२) अमोल यू. ग्रीस ३५००/-
१४३) अवनी के. गाडगीळ ३५००/-
१४४) स्वाती एस. मुसळे ३५००/-
१४५) डॉ. स्मिता एच. पवार ३५००/-
१४६) अनिल जी. चव्हाण ३५००/-
१४७) प्रशांत आर. जाधव ३५००/-
१४८) अनिल एस. सोनवणे ३५००/-
१४९) विशाखा शालिग्राम ३५००/-
१५०) स्नेहल तोडरवाल ३५००/-
१५१) गुंजन कुलकर्णी ३५००/-
१५२) सारिका एस. गोसावी ३५००/-
१५३) अथर्व एम. काळे ३१७२/-
१५४) भाग्यश्री ओक ३००१/-
१५५) अलक आचार्य ३०००/-
१५६) प्रणव पुजारी २५००/-
१५७) नीरज पै २५००/-
१५८) नीरज पै २५००/-
१५९) नीरज पै २५००/-
१६०) प्रणव पुजारी २४००/-
१६१) अमृत सामक २१००/-
१६२) राधेश एस्. जोशी २१००/-
१६३) स्मिता बर्वे २०००/-
१६४) मोरेश्वर बर्वे २०००/-
१६५) स्मिता बर्वे २०००/-
१६६) मोरेश्वर बर्वे २०००/-
१६७) विद्या भाटवडेकर २०००/-
१६८) अनिशा डे २०००/-
१६९) प्रशांत कुलकर्णी २०००/-

१७०) वर्षा पुराणिक १६००/-
१७१) तन्वी गाडगीळ ११११/-
१७२) श्रद्धा मेहता ११११/-
१७३) प्रणव पुजारी १११०/-
१७४) भाग्यश्री हर्षे ११००/-
१७५) महेंद्र वैशंपायन १००१/-
१७६) संजय व्ही. पुरंदरे १००१/-
१७७) समीरा प्रभुणे १००१/-
१७८) केतन जोशी १००१/-
१७९) शौनक के. हिंगे १००१/-
१८०) कुलदीप आर. वर्मा १००१/-
१८१) ऋषिकेश जोशी १००१/-
१८२) सचिन गाडगीळ १००१/-
१८३) जाई आर. झाणटे १०००/-
१८४) मनोहर व्हि. जोशी १०००/-
१८५) राजीव बसर्गेकर १०००/-
१८६) अतुल सी. कुलकर्णी १०००/-
१८७) विनायक एस. देशपांडे १०००/-
१८८) अभिजीत गुर्जर ६००/-
१८९) अभिजीत गुर्जर ६००/-
१९०) प्रमथ केळकर ५०१/-
१९१) गौरांग आर. काणे ५०१/-
१९२) सुरेन्द्र व्ही. कानडे ५०१/-
१९३) शशांक व्ही. कानडे ५०१/-
१९४) प्रमथ केळकर ५०१/-
१९५) किरण तापडे ५००/-
१९६) चांद्रकिशोर बी. हर्षे ५००/-
१९७) अथर्व एम. काळे ५००/-
१९८) अक्षय पटवर्धन ५००/-
१९९) कुशाल मोडक ५००/-
२००) रोहन कोंकणे ३५१/-
२०१) शिशिर बी. सहाय ३०२/-
२०२) नितीन कुलकर्णी ३००/-
२०३) मनिषा नेने २५१/-
२०४) कनाद शिरीष चाफेकर २०१/-
२०५) अमेय पुराणिक २०१/-
२०६) रोहन शिंदे २००/-
२०७) अथर्व एम. काळे २००/-
२०८) स्वराज ए. जाहिराबादकर २००/-
२०९) ओंकार गजरे १२०/-
२१०) श्रीपाद एम. हरदास १००/-
२११) सागर देशमुख १००/-
२१२) नचिकेत व्ही. नित्सुरे १००/-
२१३) जयंत आठले १/-

**एकूण** **४५५००१४/-**

***